CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com बुधवार दि. १६ नोव्हेंबर २०२२ ▶ वर्ष : २१ वे ▶ अंक : ५० वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## जिल्हा परिषद अंतर्गत गट क वर्गाच्या नोकरभरतीला राज्य सरकारचा हिरवा कंदील; ८० टक्के जागा भरणार



✔ **मुंबई** : जिल्हा परिषद अंतर्गत गट क वर्गाची नोकर भरती करण्यास राज्य सरकारने हिरवा कंदील दाखवला आहे. एकूण रिक्त जागांच्या ८० टक्के जागा भरण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. वाहन चालक आणि गट ड वर्गातील पदे वगळून इतर पदे भरण्यास आज राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. गट क वर्गासाठी होणारी ही पदभरती जिल्हा निवड मंडळ आणि जिल्हा परिषद अंतर्गत होणार आहे.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राज्यात ७५ हजार नोकर भरती करण्यात येत असून यात ग्रामविकास विभागाची ही नोकर भरती महत्त्वाची मानली जाते. गेल्या दोन वर्षामध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव असल्याने यादरम्यान राज्यातील नोकर भरतीवर निर्बंध लादण्यात आले होते. आता हे निर्बंध हटवण्यात आले आहेत. त्या अंतर्गत राज्य सरकारने गट क आणि गट ड वर्गासाठी ७५ हजार नोकर भरती करण्यात येणार असल्याचं जाहीर केलं आहे. ज्या विभागांचा किंवा कार्यालयांचा सुधारित आकृतीबंध अंतिम झालेला आहे.




# हवा होता समान वाटा; झाला शंभर टक्के घाटा, दोनही गेल्या; दहाही गेल्या, पदरात पडला भोपळा

✔ सुराज्य/सोलापूर

**निवडणूक बिनविरोध करायची होती. श्रेष्ठींकडे विनंती केली होती. त्यांनी शब्द दिला होता. दोन जागा द्यायचे ठरले होते. शेवटच्या दिवशी ऐनवेळी चक्क दहा जागा मागितल्या. म्हणजेच तिघांनाही प्रत्येकी पाच जागा असा फॉर्म्युला पुढे आणला. अर्थात कारखान्यात समान वाटा मागितला. तो मान्य झाला नाही. निवडणूक लागली आणि 'त्यांचा' शंभर टक्के घाटा झाला. देत असलेल्या दोन जागा तर गेल्याच. मागत असलेल्या दहा जागाही गेल्या आणि पदरात भोपळा पडला, अशी अवस्था भीमा सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत विरोधी परिचारक-पाटील पॅनलची झाली.**

ही 'अंदर की बात' पूर्ण निवडणुकीत कधीच 'बाहर' आली नाही. पण निवडणुकीची मतमोजणी झाली आणि पहिल्याच दिवशी खुद्द खा. धनंजय महाडिक यांनीच भरसभेत जाहीर करून टाकली. त्यामुळे निवडणुकीपूर्वी पडद्यामागे झालेल्या घडामोडी जगजाहीर झाल्या.

'भीमा'ची निवडणूक प्रशांत परिचारक-राजन पाटील हे दोन्ही माजी आमदार निवडणूक लावण्याच्या तयारीत होते. निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी महाडिक प्रयत्नशील होते. त्यासाठी त्यांनी परिचारक व राजन पाटील यांना समजवण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे शब्द टाकला. फडणवीसांनी मध्यस्थी केल्यानंतर दोन जागा त्यांना द्यायचे ठरले. पण उमेदवारी अर्ज मागे घ्यायच्या दिवशी राजन पाटील दहा जागा मागताहेत असे परिचारकांनी सांगितले. म्हणजेच दहापैकी प्रत्येकी पाच जागा परिचारक व पाटलांना द्यायच्या आणि उर्वरित पाच जागांवर महाडिकांनी समाधान मानायचे. हा समान वाटपाचा फॉर्म्युला मान्य नसल्यामुळे शेवटी 'भीमा'ची निवडणूक लागली, ही 'आतली' माहिती महाडिकांनीच मंगळवारी विजयी सभेत 'बाहेर' काढली.



### ▪ फडणवीसांनी टाकला शब्द

महाडिकांच्या विनंतीनुसार फडणवीसांनी परिचारक व राजन पाटलांना फोन करून बोलावले. राष्ट्रवादीचा मेळाव्याचे कारण सांगून राजन पाटील भेटीला दांडी मारली. पण परिचारक फडणवीसांना भेटले. निवडणूक बिनविरोध करण्यासाठी दोन जागांवर परिचारक तयार झाले. मात्र राजन पाटील तयार नव्हते, असे परिचारकांनी सांगितल्याचे महाडिकांनी स्पष्ट केले.

### ▪ शेवटच्या क्षणी काय झाले?

दि.३ नोव्हेंबर उमेदवारी अर्ज माघार घ्यायचा शेवटचा दिवस होता. महाडिक २ नोव्हेंबरला सोलापुरात आले. त्याच दिवशी फडणवीस यांच्या सांगण्यावरून महाडिकांनी परिचारक व पाटलांना फोन केला. दोन जागांवर परिचारक तयार झाले. रात्री फोन करण्याचा परिचारकांनी शब्द दिला. पण रात्री फोन केलाच नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी महाडिकांनीच परिचारकांना फोन केला. त्यावेळी 'माझी अडचण नाही, पण राजन पाटील दहा जागा मागताहेत' असे परिचारकांनी सांगितले. हा समान जागा वाटपाचा प्रस्ताव होता. तो मान्य नसल्यामुळे त्यास नकार दिला आणि निवडणूक लागली, अशी 'इनसाईड स्टोरी' महाडिकांनी भर सभेत सांगितली.

## पंढरपूर, मोहोळमध्ये परिवर्तन करू शकतो

### परिचारक-पाटील यांना आडवे जाणारच : महाडिक

✔ सुराज्य/मोहोळ

आपण सगळे वेगवेगळ्या पक्षाचे आहोत. हा १२ बैलांचा औत तयार झालेला आहे. पंढरपूर आणि मोहोळ या दोन तालुक्यांमध्ये आपण जे ठरवले ते होऊ शकते, या दोन तालुक्यात आपण परिवर्तन करू शकतो, असे प्रतिपादन भीमा सहकारी साखर कारखान्याचे सर्वेसर्वा खासदार धनंजय ऊर्फ मुन्ना महाडिक यांनी केले.

भीमा सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकिमध्ये सर्वच्या सर्व जागा जिंकल्यानंतर मंगळवारी कारखान्यासमोर सभेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना महाडिक म्हणाले की विश्वराज हा माझा मुलगा अमेरिकेमध्ये बोस्टर्न युनिव्हर्सिटीमधून त्याने शिक्षण पूर्ण केले आहे. त्याला नोकरीत १ कोटींचे पॅकेज मिळाले होते. परंतु त्याने ते सर्व नाकारून तो थेट शेतकऱ्यांच्या बांधावर आला आहे. त्याने संपूर्ण परिसराची माहिती घेतली आणि कारखान्यांमध्ये लक्ष घातले आहे.

दररोज दीड लाख लीटर इथेनॉल तयार करण्याच्या प्रकल्पासाठी त्याला सर्वांनी सहकार्य करावे, असे त्यांनी आवाहन केले. सुधाकरपंत परिचारक हे लुनावर फिरत होते. परंतु प्रशांत परिचारक हे तोंडात सोन्याचा चमचा घेऊनच जन्माला आले आहेत.एवढी मोठी संपत्ती कशी जमवली माहीत नाही. राजन पाटील हे यामाहावर फिरत होते. त्यांचीही संपत्ती भरपूर आहे. पुण्यात, मुंबईतही प्रॉपर्टी आहे. सोलापुरात त्रिपुरसुंदरी हे ५० कोटींचे हॉटेल घेतले आहे. दोघेही खरबोपती झालेले आहेत. यांना भीमा कारखान्यात लक्ष घालायची गरज नव्हती. दोन जागेसाठी परिचारक तयार झाले होते. परंतु राजन पाटील यांनी दहा जागांची मागणी केली अन् निवडणूक आपल्यावर लादली आणि सभासदांनी त्यांना त्यांची जागा दाखवली, असे सांगून यापुढे प्रत्येक निवडणुकीत दोघांनाही आडवे जाणार असल्याचेही महाडिक यांनी आवर्जून सांगितले.



## जमिनीतील गुप्तधन काढण्यासाठी ५ जणांकडून १३ लाख उकळले

### बार्शीच्या भोंदू महाराज पिता-पुत्राच्या हाती मंगळवेढा पोलिसांच्या बेड्या

✔ सुराज्य/सोलापूर

अंगणातील गुप्तधन काढून देतो, करणी बाधा घालवितो, घरात भांडणे होऊ देत नाही होमहवन करतो असे म्हणून मंगळवेढ्यातील लोकांना गंडवणाऱ्या भोंदू महाराजासह त्यांच्या पुत्रास पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. पोलिसांनी १२ तासात ही कारवाई केली आहे.

अधिक माहिती अशी दि. १४ नोव्हेंबर २०२२ रोजी मंगळवेढा पोलीस ठाण्यास फिर्यादी मायाक्का रेवणसिध्द मोटे रा. नंदेश्वर ता. मंगळवेढा जि.सोलापूर यांनी आरोपी नामे महाराज भगवान ऊर्फ सुदर्शन जगन्नाथ स्वामी व त्याचा मुलगा विरभद्र ऊर्फ उदय भगवान ऊर्फ सुदर्शन स्वामी दोघे रा. मालवंडी ता. बार्शी जि. सोलापूर यांनी जुलै २०२२ ते आजतागायत या कालावधीत वरील दोघांनी फिर्यादीचे व फिर्यादीचे मयत पती रेवणसिध्द तसेच गावातील मल्हारी म्हाळाप्पा करे, चेतन चंद्रकांत वाघमोडे, तानाजी बिरा सरग व सुशिलकुमार भिकू गवळी रा. जय भवानीनगर, मंगळवेढा असे सर्वांना त्यांची करणी बाधा घालवितो, घरात भांडणे होऊ देत नाही घरातील व जमिनीतील गुप्तधन सोने काढून देतो, होमहवन करतो असे म्हणून होमहवन केले. फिर्यादीचे पती रेवणसिध्द यांना काठीने पायावर, पाठीवर, जबर मारहाण करून फिर्यादीच्या पतीच्या डाव्या पायाचे हाड मोडून घरात धूप अंगारे जाळून फिर्यादीला व फिर्यादीच्या घरातील लोकांना पांढरी पावडर पाजून सर्वांकडून एकूण १३ लाख ४४ हजार ९०० रुपये रोख व फोन पे माध्यमातून घेऊन फिर्यादींच्या त्याच्या सोबत असलेल्या लोकांची फसवणूक केली आहे. म्हणून सदर भोंदू महाराज व त्याचे सहकारी (पिता-पुत्रांना ) यांचे विरुद्ध मंगळवेढा पोलीस ठाण्यात भादवि कलम ३२६, ४२०, ३४ सह महाराष्ट्र नरबळी आणि अमानुष अनिष्ठा व अघोरी प्रथा, जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत अधिनियम २०१३ चे कलम ३ (२) (३), २ (१), ख ४ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. या गुन्ह्यातील आरोपी महाराज भगवान ऊर्फ सुदर्शन जगन्नाथ स्वामी व त्याचा मुलगा विरभद्र ऊर्फ उदय भगवान ऊर्फ सुदर्शन स्वामी दोघे रा. मालवंडी ता.बार्शी जि. सोलापूर यांच्या राहत्या घरी मंगळवेढा पोलीस ठाणे कडील तपास टिम पाठवून सदर दोन्ही आरोपींना दि. १४/११/२०२२ रोजी रात्री साडे दहाच्या सुमारास ताब्यात घेऊन त्यांना सदर गुन्ह्यात अटक केलेली आहे.



सदर गुन्ह्यातील विशेष बाब म्हणजे यातील फिर्यादी व त्यांच्या सोबत असलेल्या लोकांनी आरोपीस तुम्ही इतके गुप्तधन जमिनीतून काढून देता, करनीबाधा घालविता तर तुम्ही स्वतः पत्राच्या घरात का राहता असे विचारले असता यातील भोंदू महाराज यांनी सदरचे गुप्तधनाचे सोने, दागिने हे तुमच्या भाग्यात असून ते माझ्या भाग्यात नाहीत असे म्हणून समोरील लोकांना फसविलेले आहे.


## बार्शीतील शाखा अभियंता अँटी करप्शनच्या जाळ्यात

### दोन हजारांची स्वीकारली लाच

✔ सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग कार्यालय बार्शी येथील शाखा अभियंता आयुब दस्तगीर शेख (वय-५४) यांनी वैयक्तिक संपत्ती फायदा मिळवण्यासाठी दोन हजाराची लाच घेताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने त्यांना मंगळवारी रंगेहाथ पकडले आहे.

ही कारवाई दुपारी चारच्या दरम्यान झाली. तक्रारदार हे कॉन्ट्रॅक्टर असून, त्यांनी बार्शी तालुक्यातील नारेवाडी या ठिकाणी समाज कल्याण विभागाच्या दलित वस्ती सुधार योजनेतून काम केले होते.त्या कामाचे बिल काढण्यासाठी शाखा अभियंता आयुब शेख यांनी २ हजार रुपये लाचेची मागणी केली होती. दरम्यान मंगळवारी ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बार्शी पंचायत समितीमध्ये आढावा बैठक घेतली.ही आढावा बैठक संपते, तोपर्यंत पंचायत समिती कार्यालय आवारात लाच घेताना प्रतिबंधक विभागाच्या पथकाने शाखा अभियंता शेख यांना पकडले.



ही कारवाई पोलीस अधीक्षक लाच लुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, अमोल तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षण अधिकारी पोलीस उपअधीक्षक गणेश कुंभार, पोलीस निरीक्षक उमाकांत महाडिक, पोलीस अंमलदार पोह.शिरीषकुमार सोनवणे, पोलीस नाईक अतुल घोडके, चालक पोलीस शिपाई उडानशिव यांनी पार पाडली. ३१ ऑक्टोबर रोजी प्राथमिक शिक्षणाधिकारी किरण लोहार यांना २५ हजाराची लाच घेताना अँटीकरप्शन विभागाने रंगेहाथ पकडले होते.

या प्रकरणा नंतर सीईओ दिलीप स्वामी यांनी प्रशासकीय कामकाजात पारदर्शकपणा आणण्याचा प्रयत्न केला. तडकाफडकी २० कर्मचाऱ्यांच्या बदल्या त्यांनी केल्या. एकीकडे बदल्यांची रणधुमाळी उडत असताना बार्शी पंचायत समिती येथील शाखा अभियंता लाच लाच घेताना पकडल्याची वार्ता समजताच जिल्हा परिषद पुन्हा हादरली आहे.

## कायरन पोलार्ड-ब्रावो रिलीज, कार्तिक-जाडेजाला रिटेन




✔ **नवी दिल्ली** : आयपीएलच्या आगामी हंगामाआधी दहा संघांनी काही खेळाडूंना रिलीज केलेय. यामध्ये केन विल्यमसन, मयांक अग्रवाल, कायरन पोलार्ड आणि ब्राव्होसह अनेक दिग्गज खेळाडूंना रिलीज करण्यात आले आहे. तर रविंद्र जाडेजा, अर्जुन तेंडुलकर, विजय शंकर, अंबाती रायडू, दिनेश कार्तिक यांच्यासह अनेक खेळाडूंना आपापल्या संघांनी कायम ठेवलं आहे. २३ डिसेंबरला आयपीएलचा लिलाव पार पडणार आहे. मुंबई, चेन्नईसह सर्व संघानी खेळाडूंची यादी जाहीर केली आहे. पाहूयात कोणत्या संघात कोणते खेळाडू कायम आहेत.


## वाघोली येथील स्कूल बसच्या धडकेने दुचाकीवरील ग्रामसेवक ठार

✔ **सोलापूर** : वेगाने जाणाऱ्या स्कूल बसच्या धडकेने दुचाकी वरील ग्रामसेवक गंभीर जखमी होऊन जागीच मरण पावले. हा अपघात सोमवारी दुपारच्या सुमारास वाघोली (ता.मोहोळ) येथे घडला.

या प्रकरणात कामतीच्या पोलिसांनी बसचा चालक खंडू काटकर (रा.बेलाटी ता.उत्तर सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मल्लिनाथ सातप्पा जिडगी (वय ४७ रा. वागदरी ता.अक्कलकोट) हे ग्रामसेवक काल दुपारी २ वाजेच्या सुमारास कामती येथील एम.बी.चव्हाण शाळेत मुलाच्या प्रवेशाच्या कामासाठी गेले होते. तेथून परत सोलापूरकडे येत असताना एमएच१३-एएक्स-०६७३ या स्कूलच्या बसच्या धडकेने ते गंभीर जखमी झाले. आणि उपचारापूर्वी मयत झाले. या घटनेची फिर्याद त्यांचे नातेवाईक राजशेखर पाताळे (रा. शिरवळ) यांनी कामती पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी चालकावर गुन्हा दाखल केला.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तुम्ही सायन्स सेंटर पाहिलाय का?

| कल्याण |
| --- |
| --------- |

| मेन बाजार |
| --- |
| --------- |

## राज्यातील २१ टक्के फौजदारी खटले प्रलंबित

### राजकारण्यांच्याबाबतीत धक्कादायक अहवाल

✔ सुराज्य/नवी दिल्ली

**सुप्रीम कोर्टाच्या अहवालातून एक धक्कादायक माहिती उजेडात आली आहे. महाराष्ट्रातील आजी- माजी आमदार आणि खासदारांवरील प्रलंबित खटल्यांबाबत ही चिंताजनक स्थिती आहे. गेल्या तीन वर्षांच्या तुलनेत आजी माजी आमदार आणि खासदारांवरील तब्बल २१ टक्के गुन्हेगारी फौजदारी खटल्यांचे निकालच लागले नसल्याची माहिती समोर आली आहे.**

राज्यातील आजी-माजी आमदार-खासदारांविरुद्ध सर्वाधिक ४८२ गुन्हेगारी खटले दाखल झाले आहेत. यापैकी १६९ प्रकरणे पाच वर्षांहून अधिक काळ प्रलंबित आहेत, अशी माहिती अधिवक्ता स्नेहा कलिता यांच्यामार्फत दाखल करण्यात आलेल्या ॲमिक्स क्युरीच्या अहवालात देण्यात आली आहे तर उच्च न्यायालयाकडून मिळालेल्या आकडेवारीनुसार, डिसेंबर, २०१८ मध्ये महाराष्ट्रातील विद्यमान आणि माजी आमदार आणि खासदारांविरुद्ध प्रलंबित असलेले फौजदारी खटले ४,१२२ दाखल होते. डिसेंबर, २०२१ मध्ये हा आकडा ४,९८४ पर्यंत गेला. गेल्या तीन वर्षांत या खटल्यांमध्ये २१ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

ज्येष्ठ वकील विजय हंसरिया यांनी दिलेल्या माहितीनुसार, यातील १,८९९ प्रकरणांचा गेल्या पाच वर्षांपासून निकालच लागलेला नाही. तर १,४७५ खटले हे गेल्या दोन ते पाच वर्षांपासून तर १,५९९ प्रकरणे ही दोन वर्षांपासून प्रलंबित आहेत. विशेष बाब म्हणजे ऑक्टोबर २०१८ नंतर जवळपास २,७७५ प्रकरणांचा निकाल हा फास्ट ट्रॅक न्यायालयात लागला आहे.

विद्यमान आणि माजी आमदार खासदारांवरील प्रलंबित खटल्यांबाबत महाराष्ट्रानंतर ओडिसा दुसऱ्या स्थानावर आहे. तेथील खासदार आमदारांविरुद्ध ४५४ गुन्हेगारी खटले दाखल असून त्यातील ३२३ प्रकरणे पाच वर्षांहून अधिक काळापासून प्रलंबित आहेत. मात्र या खटल्यांचा निकालाची प्रक्रियादेखील अत्यंत संथ गतीने सुरू असल्याची माहिती आहे.



महाराष्ट्र, ओडिसानंतर आजी-माजी आमदार-खासदारांवरील प्रकरणांमध्ये केरळ ३८४, मध्य प्रदेश ३२९, तामिळनाडू २६०, पश्चिम बंगाल २४४, कर्नाटक २२१, झारखंड १९८, दिल्ली ९३, आंध्र प्रदेश ९२, आणि पंजाब ९१ खटले प्रलंबित असल्याचेही अहवालात नमुद करण्यात आले आहे. सीबीआय आणि ईडीने याबाबत सादर केलेल्या अहवालानुसार, ओडीसातील १४ विद्यमान आणि ३७ माजी खासदारांविरुद्ध १२१ खटले प्रलंबित आहेत. तर ३४ विद्यमान आणि ७८ माजी आमदारांविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले आहेत. याशिवाय ५८ प्रकरणांमध्ये आरोपांसाठी संबंधितांना जन्मठेपेची शिक्षा असल्याचीही माहिती नमुद करण्यात आली आहे. तसेच तब्बल ५१ आजी आणि माजी खासदारांवर पीएमएलए अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यातील २८ प्रकरणांची चौकशी सुरू असून यात तब्बल ७१ आमदार आरोपी आढळून आले आहेत.

धक्कादायक बाब म्हणजे, उत्तर प्रदेश, राजस्थान, बिहार, तेलंगणा, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश आणि जम्मू आणि काश्मीर या राज्यातील प्रमुख उच्च न्यायालयांनी संबंधित राज्ये, केंद्रशासित प्रदेशातील आमदार-खासदारांबाबत कोणतीही माहिती देण्यात आली नसल्याचे हंसरिया यांनी सांगितलं. दरम्यान, उत्तर प्रदेशचे नेते अतीक अहमद यांच्यावर १९७९ ते २०१९ या काळात १०६ गुन्हेगारी खटले दाखल करण्यात आले होते.

त्यापैकी १७ हत्या प्रकरणातील, १२ यूपी गँगस्टर कायद्यांतर्गत आणि आठ यूपी गुंडगिरी कायद्यांतर्गत हे गुन्हे दाखल करण्यात आले होते. अहमद यांनी तुरुंगात असतानाही मोठे गुन्हे केल्याचे आढळून आल्याने सर्वोच्च न्यायालयाने त्यांना २०१९ मध्ये गुजरातच्या तुरुंगात हलवण्याचे आदेश दिले होते.

CMYK

# इशाऱ्यातून बोध घ्या

भारतीय राज्य घटनेत धर्मांतरांला अनुमती आहे पण ती स्वेच्छेची. ज्याला वाटले तो धर्मांतर करू शकतो पण कायद्याच्या चौकटीत राहूनच. कायद्याने ही मुभा दिली असली तरी सक्तीचे धर्मांतर करता येणार नाही, असे घटनेत स्पष्टपणे बजावले आहे. तरी देखील भारतात सक्तीचे धर्मांतर सुरू आहे. त्यासाठी आमिषे दाखवली जात आहेत. भारत हा बहुधर्मीय देश आहे. ज्याला जो धर्म आवडे तो धर्मांतर करू शकतो. परंतु यूपी व केरळ राज्यांमध्ये सक्तीच्या धर्मांतराचे प्रकार सर्रासपणे घडत आहेत. त्याचे लोण इतर राज्यातही पसरू लागले आहे. त्यामुळे यूपीत धर्मांतरांवर बंदी आणली गेलीय. कर्नाटकातही त्याबाबतचे विधेयक तयारही आहे. आता हा प्रश्न कोर्टात गेल्याने न्यायालयाच्या निकालाची प्रतीक्षा करावी लागेल. दरम्यान, सोमवारच्या सुनावणीत कोर्टाने याबाबत केंद्र सरकारला काही प्रश्न विचारून त्यावर स्पष्टीकरण मागवले आहे. राज्यघटनेने दिलेले धार्मिक स्वातंत्र्य म्हणजे काय, हे सर्वप्रथम बघितले पाहिजे. धर्माचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या नावाखाली धर्मांतर केले जायचे. परंतु, हे धर्मांतर आपल्या घटनेच्या चौकटीत बसते का, हे बघणे गरजेचे आहे. भारत हे धर्माच्या किंवा पंथाच्या दृष्टीने सर्वात वैविध्यपूर्ण राष्ट्र आहे. भारत भूमी ही चार महत्त्वाच्या धर्मांची जन्मभूमी मानली जाते. हिंदू, जैन, बौद्ध आणि शीख असे हे चार धर्म. पुरातन काळापासूनच भारताने अनेक पंथांच्या माणसांना आसरा दिल्याचे अनेक दाखले आहेत. त्यामुळे भारतात हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, शीख, पारशी आणि इतर बऱ्याच पंथांची माणसे एकत्र गुण्यागोविंदाने नांदत असतात. यात आपल्याला नक्कीच विविधतेत एकता दिसून येते. भारतात असंख्य वेळा धर्मांतर करण्यात आले होते व ते अजूनही दिसून येते. भारतातील सर्वात छोटे राज्य म्हणजेच गोवा. इथे वर्षानुवर्षे धर्मांतर होत असल्याचे लक्षात येते. ब्रिटिश ख्रिश्चन



मिशनरीजमुळे धर्मांतराच्या विरोधात कायदे तयार करण्याची गरज पडली. हिंदू संस्कृती अबाधित ठेवण्यासाठी उदयपूर राज्य रूपांतरण विरोधी कायदा, १९४६ यांसारखे कायदे तयार केले गेले. सर्वप्रथम घटना तयार करताना 'संथनम्' जे घटना मसुदा समितीमध्ये होते, त्यांनी 'अनुच्छेद २५' मसुदा तयार करत असताना काही गोष्टी मांडल्या. 'प्रोपोगेट' म्हणजेच प्रसार हे खरंतर 'अनुच्छेद १९' प्रमाणे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. परंतु, यामध्ये 'धर्मांतर' हा शब्द वापरला नाही किंवा 'कन्व्हर्ट' हा शब्द वापरलेला नाही. ख्रिश्चन मिशनरि वेगवेगळे आमिषे दाखवून व प्रसार करण्याच्या नावाखाली सामान्य माणसाला बाटवत होते. जर हे धर्मांतर स्वतःच्या सद्सद्विवेकबुद्धीने झालेले असेल तर ते योग्य आहे. परंतु, जर का कोणत्याही प्रकारचा दबाव धर्मांतर करणाऱ्या व्यक्तींवरती होत असेल तर त्याची शासनाने उचित दखल घेणे आणि कारवाई करणे गरजेचे आहे. त्यामुळे हा अनुच्छेद अधिकार व हक्क यापेक्षा जास्त सहिष्णू होता. ही सहिष्णुता सामाजिक सुव्यवस्थेला धरूनच असायला पाहिजे. धर्मांतर म्हणजे स्वतःचा धर्म सोडून दुसरा धर्म स्वीकारणे. हे जितके सोपे वाटत असेल, त्यापेक्षा ते करणे खूप कठीण आहे. एखाद्या व्यक्तीला स्वतःचा धर्म सोडून दुसरा धर्म स्वीकारायला लावणे म्हणजे त्याला स्वत:च्या धर्मातले दोष दाखवणे. हे दोष त्याला पटवून देणे आणि त्यानंतर दुसऱ्या धर्मात ते दोष कसे नाहीत हे पटवून देणे. परंतु अशाप्रकारे सक्तीच्या धर्मांतराने अनेक प्रश्न उभे राहतात. कायदा-सुव्यवस्थेची स्थिती निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे घटना समितीने धर्मांतराचा मुद्दा 'अनुच्छेद २५' मधून वगळला होता. त्यामुळे कोणत्याही धर्मात जरी 'प्रसार करणे' यामध्ये धर्मांतर येत असले, तरीसुद्धा या अनुच्छेदानुसार धर्मांतर घटनेला अनुसरून नाही, याची नोंद घेणे आवश्यक आहे. भारताचे धर्म स्वातंत्र्य कायदा किंवा धर्मांतर विरोधी कायदा हे राज्य स्तरावर केलेले आहेत. हे स्वतःच्या इच्छेने नसलेल्या धर्मांतरांवर आळा घालण्यासाठी केले गेले आहेत. जेव्हा केंद्रात धर्मांतरावर केले जाणारे कायदे पारित होऊ शकत नव्हते, तेव्हा सर्वप्रथम ओडिशा आणि मध्यप्रदेश या दोन राज्यांमध्ये कायदे पारित केले. जबरदस्तीने केलेल्या धर्मांतराला शिक्षा करण्याची तरतूद या कायद्यात केली आहे. मध्यप्रदेश हे दुसरे राज्य होते, ज्याने १९६८ साली कायदा पारित केला. यातसुद्धा ओडिशासारखे बरेच कलम होते. अरुणाचल प्रदेश, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश यांसारख्या राज्यांमध्ये कायदे पारित करण्यात आले. हे धर्मांतर विरोधी कायदे काही ठरावीक राज्यांमध्येच आणलेले दिसून येतात. सक्तीच्या धर्मांतरामुळे देशाच्या सामाजिक सुरक्षेला धोका असल्याची चिंता खुद्द कोर्टाकडूनच व्यक्त केली गेली आहे. त्यामुळे केंद्र सरकारला याविषयी कठोर पाऊल उचलावेच लागेल.

## सामाजिक

# महागाईची महामारी !

**रिझर्व्ह बँक आणि सरकारने काही महिन्यांपूर्वी महागाईचा दर आटोक्यात आला असल्याचं चित्र रंगवायला सुरुवात केली होती; परंतु असे सर्व प्रयत्न फोल ठरत आहेत. अलिकडेच जाहीर झालेला महागाईचा निर्देशांक आणि प्रत्यक्षातली महागाई यात जमीन-अस्मानाचं अंतर आहे. सरकारी अधिकारीही ते मान्य करतात. केंद्र आणि राज्य सरकारच्या कामगारांना दर तीन महिन्यांनी महागाई भत्ता मिळतो; परंतु बाजारात पहायला मिळणारी प्रत्यक्षातली महागाई आणि महागाई भत्त्यात होणारी वाढ यात अंतर असतं. असं असलं तरी, अन्य घटकांना काहीच मिळत नसल्याने सरकारी कर्मचाऱ्यांना महागाई सुसह्य होते, इतकंच. एकीकडे जागतिक मंदीची चर्चा असताना दुसरीकडे महागाईचा आलेख मात्र दररोज उंचावत आहे. कोरोनानंतर आता महागाईची महामारी सामान्य माणसाला झपाटून टाकण्याची चिन्हे दिसत आहेत.**

कोरोनामुळे २०२० आणि २०२१ या दोन वर्षांमध्ये लाखो लोकांना आपला जीव गमवावा लागला आणि लाखो लोकांना रोजगार गमवावा लागला. लोकांच्या दैनंदिन जीवनावर कोरोनाचा काय परिणाम झाला याबद्दल कोणतीही आकडेवारी किंवा सर्वेक्षण समोर आलेलं नाही; परंतु टाळेबंदीमुळे लोकांच्या रोजगारावर संकट आलं आणि पगारात कपात झाली तेव्हा लोकांच्या दैनंदिन जीवनावर नक्कीच परिणाम झाला. दोन वर्षांच्या कोरोना महामारीच्या प्रभावातून जग सावरलंही नव्हतं, तोच रशिया आणि युक्रेनमध्ये युद्ध सुरू झालं. या युद्धामुळे कच्चं तेल, नैसर्गिक वायू, पोलाद, ॲल्युमिनियमसह अनेक वस्तूंच्या किमती गगनाला भिडल्या. युक्रेन-रशिया स्वत: अन्नपदार्थांचे मोठे पुरवठादार असल्यामुळे जगभर अन्नधान्याचं संकट आलं. त्यामुळे महागाई वाढली. कच्चं तेल महागल्याने पेट्रोल-डिझेलचे दर वाढले आहेत. परिणामी, वाहतुकीच्या दरात सारखी वाढ होत आहे. महागड्या आयातगॅसमुळं सीएनजी-पीएनजी महाग झाले. गहू आणि खाद्यतेल महाग झालं. पामतेलाचे भाव वाढले तर दैनंदिन जीवनावश्यक वस्तू महागल्या. एकंदरीत, सर्वसामान्यांच्या घरातल्या बजेटवर प्रभाव टाकण्याचं काम महागाई करत आहे.

रशियाने युक्रेनवर केलेल्या हल्ल्यानंतर जगभरातल्या पुरवठा साखळीतल्या समस्यांमुळे महागाई आणखी भडकली. खाद्यपदार्थांपासून सर्व काही महाग झालं. जगातल्या सर्व चलनांच्या तुलनेत डॉलर मजबूत झाला. रुपया, येन असो वा युरो; सर्व चलनांनी डॉलरपुढे लोटांगण घातलं. २०२२ मध्ये डॉलरच्या तुलनेत रुपया दहा टक्क्यांपेक्षा अधिक घसरला आहे. परिणामी, आयात महाग झाली. भारताच्या परकीय चलनसाठ्यातही घट झाली आहे. परकीय चलनाचा साठा ६४० अब्ज डॉलरवरून ५३२ अब्ज डॉलरपर्यंत घसरला आहे. महागाई कोणत्याही एका घटकात वाढत नाही आणि तिचा त्रास फक्त एकाच घटकाला होत नाही, तर तो सर्व अंगांना होतो. भारतातून परदेशात जाऊन शिक्षण घेणाऱ्यांचं प्रमाण मोठं आहे.




आपल्या मुलांना शिक्षणासाठी परदेशात पाठवणाऱ्यांचा त्रास वाढला आहे. कारण परदेशी डॉलर पाठवायचे, तर जास्त रुपये खर्च करावे लागतात. अमेरिकेतली महागाई ४० वर्षांमधल्या सर्वोच्च पातळीवर गेली आहे. तिथली केंद्रीय बँक असलेल्या फेडरल रिझर्व्हने महागाईला लगाम घालण्यासाठी व्याजदर वाढवण्याची प्रक्रिया सुरू केली. भारतातली किरकोळ महागाई एप्रिल २०२२ मध्ये ७.७९ टक्क्यांच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचली होती. रिझर्व्ह बँकेने घालून दिलेल्या मर्यादेच्या ती जवळपास दुप्पट होती. मे महिन्यापासून रिझर्व्ह बँकेने रेपोदर वाढवण्यास सुरुवात केली. त्यानंतर काही काळ महागाई थोडी कमी झाली. त्यानंतर मात्र पुन्हा वाढायला लागली. आता सणासुदीच्या काळात तर ती फारच वाढली आहे. रेपो दरात १.९० टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे.

सप्टेंबर महिन्यात महागाईचा दर पुन्हा ७.४१ टक्क्यांवर पोहोचला आहे, त्यानंतर कर्ज आणखी महाग होण्याची भीती आहे. यामुळे आधीच महाग झालेला ईएमआय आणखी महाग होऊ शकतो. ईएमआय वाढल्याने लोकांचं घरचं अर्थकारण बिघडलं आहे. एकीकडे जागतिक कारणांमुळे महागाई वाढली आहे तर दुसरीकडे खरीप हंगामातल्या अवकाळी पावसानेही अडचणीत वाढ केली आहे. तेलबीयांसह अन्य पिकांचं नुकसान झाल्याने बाजारात टंचाई निर्माण व्हायला लागली आहे. कोणत्याही गोष्टीची टंचाई होणार असल्याचा अंदाज आला की व्यापारी अचूक फायदा घेतात. कृत्रिम टंचाई निर्माण करून नफा पदरात पाडून घेतात. आताही तसंच व्हायला लागलं आहे. किरकोळ महागाई आणि औद्योगिक उत्पादन या दोन्ही आघाड्यांवर भारतीय अर्थव्यवस्थेला मोठा धक्का बसला आहे.

आकडेवारीनुसार, खाद्यपदार्थांच्या किमतीत वाढ झाल्याने किरकोळ चलनवाढीचा दर पाच महिन्यांच्या उच्चांकी ७.४ टक्क्यांवर पोहोचला आहे तर १८ महिन्यांमध्ये औद्योगिक उत्पादनात प्रथमच घट झाली आहे. किरकोळ महागाई सलग नवव्या महिन्यात रिझर्व्ह बँकेच्या दोन ते सहा टक्क्यांच्या समाधानकारक पातळीच्या वर राहिली आहे. ऑगस्टमधल्या ७.६२ टक्क्यांवरून या वर्षी सप्टेंबरमध्ये खाद्यपदार्थांची महागाई ८.६० टक्क्यांवर पोहोचली आहे. महागाई सहा टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास रिझर्व्ह बँकेला केंद्र सरकारला अहवाल सादर करावा लागेल. या अहवालात रिझर्व्ह बँकेला किरकोळ चलनवाढ दोन ते सहा टक्क्यांच्या मर्यादेत ठेवण्यात तिला अपयश का आलं, हे स्पष्ट करावं लागेल.

रिझर्व्ह बँकेला केंद्र सरकारने किरकोळ चलनवाढ दोन ते सहा टक्क्यांच्या दरम्यान राहील, याची खात्री करण्यासाठी सांगितलं आहे. येत्या महिन्यातली आकडेवारी आणि अमेरिका फेडरल रिझर्व्हचं धोरण डिसेंबरमध्ये रिझर्व्ह बँक व्याजदर ०.३५ टक्के वाढवणार की ०.५० टक्के वाढवणार, हे स्पष्ट होईल. २०२३ मध्ये अमेरिका, युरोपीय देशांनाही मंदीचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे रोजगाराचं संकट निर्माण होऊ शकतं. कंपन्या टाळेबंदी करू शकतात. एकंदरीत, महागाईवर कोणालाही नियंत्रण आणता येताना दिसत नाही. रिझर्व्ह बँक किंवा सरकार यासंदर्भात परिणामकारक पाऊल उचलण्याच्या परिस्थितीमध्ये दिसत नाही. त्यामुळे जागतिक अस्वस्थता प्रमाण मानून का होईना, सामान्यजनांना येत्या काळातही महागाईच्या भस्मासुराचा सामना करत दैनंदिन जीवनाचा गाडा ओढावा लागणार आहे, हे निश्चित !

**- रवींद्रकुमार जाधव.**

## टुडेज ब्लॉग

# निसर्ग आणि माणसाचे नाते !

**'हरितदृष्टी : जैवविविधता आणि शाश्वत विकासाचे शिक्षण' हे बसवंत विठाबाई बाबाराव यांनी त्यांच्या अभ्यास संशोधन आणि वैयक्तिक अनुभवातून लिहिलेले पुस्तक आहे. हे पुस्तक हातात पडले, तेंव्हा सुरुवातीला असे वाटले की शेती, जंगल, वनस्पती, जैवविविधता आणि यात होणारे बदल आणि प्रदूषण याबद्दलची माहिती असावी. खरंतर मला स्वत:ला या विषयात रूची असल्याने मी पुस्तक वाचायला सुरुवात केली. मनोगत वाचत असतानाच माझी उत्सुकता वाढली होती. एखादा लेख वाचायला घेतला की त्यापुढच्या लेखामधे काय लिहिलेले असेल इतकी ती उत्सुकता ताणली जायची.**

वाचकाला मंत्रमुग्ध करण्याचे संपूर्ण श्रेय लेखकाला, त्याच्या ओघवत्या लेखन शैलीला जाते. कारण लेखकाने हे लिहिताना केवळ माहिती स्वरूपात न लिहिता ते स्वतःच्या अनुभव स्वरूपात आणि सर्वसामान्यांना समजतील अशा भाषेत लिहिले. साहजिकच एकेका लेखातून एखाद्या प्रश्नाची उकल होण्यासह एखादी कथा वाचल्याचाही फील येतो. शेती, जंगल या विषयावरचे पुस्तक म्हटलं की हे ग्रामीण भागातील लोकांसाठी असे वाटू शकते, मात्र हा गैरसमज पुस्तक वाचल्यानंतर दूर होतो. हे पुस्तक जितके ग्रामीण भागातील लोकांसाठी उपयुक्त आहे, तितकेच शहरी भागात राहणाऱ्या लोकांसाठीही महत्त्वाचे आहे.

टेरेस गार्डनिंगपासून ते शाश्वत जीवनशैलीपर्यंतच्या अनेक विषयांना हे पुस्तक स्पर्श करते. आपण जरी शहरात राहत असू, तरी आपल्या बहुतेकांची नाळ ही ग्रामीण भागाशी जोडलेली आहे. बालपणीच्या माझ्या आठवणींमधील अनेक गोष्टींचा पुनर्प्रवास या पुस्तकातून मला करता आला. शेताबद्दल माहिती असली तरी जंगले, तेथील जैवविविधता, रानभाज्या, त्याला जोडून येणाऱ्या सणांबद्दल नवीन माहिती मिळाली.

रानभाज्यांबद्दल नुसती माहिती न देता त्याच्या आजूबाजूला असणारे मानवी जीवन आणि सण, उत्सव याबद्दल अतिशय रंजक लिखाण पुस्तकात वाचायला मिळाले. वेळा अमावस्येचे इतके सुरेख वर्णन मी पहिल्यांदाच वाचले. राजकारण, राजकीय निर्णय आणि राजकारणी यांना लेखकाने वगळले नाही. शेतीविषयक योजना आणि धोरणे याचे सद्य:परिस्थितीतील अचूक आणि मार्मिक विश्लेषण पुस्तकात आहे. तसेच सध्याच्या शेतकऱ्यांचा शेतीकडे बघण्याचा दृष्टिकोन, शेतीचे बाजारीकरण इत्यादी बाबी ही अभ्यासपूर्ण रितीने मांडल्या आहेत.

निर्सगत: कोणतीच गोष्ट समसमान नाही, तर माणसाने हा हट्ट का करावा? असे अनेक निसर्ग आणि माणसाच्या नात्यातील प्रश्न समोर आणले आहेत आणि त्याची उत्तरेही शोधण्याचा प्रयत्न केला आहे. प्रश्न मांडत असताना या प्रश्नांची उत्तरे शोधणाऱ्या माणसांची धडपडही लेखकाने अतिशय तळमळीने मांडली आहे.

गीता तिडके या आश्रमशाळेत शिकवणाऱ्या शिक्षिकेबद्दलच्या लेखातून अनेकांना प्रेरणा




मिळू शकेल. शेतातल्या आंब्याच्या झाडाबद्दलचे लिखाण सर्वात जास्त मला आवडले. डोळ्यांसमोर त्या झाडाचे आणि त्याभोवतीच्या माणसांचे चित्र उभे राहील असे हे लिखाण. केवळ झाड आणि निसर्ग नाही, तर त्या झाडांभोवतीची माणसे, नाती, त्यातील भावनांचे चढउतार हे सगळे पुस्तकात वाचायला मिळाले. शेतीच्या उत्सवाबद्दल लिहिताना रानभाज्या फळांचे रसाळ वर्णन याबरोबर माझ्या आठवणीही जाग्या झाल्या. मी अनुभवलेल्या वेळा अमावस्येच्या आंबिलाची चव अजून माझ्या जिभेवर आहे, पण गेले कित्येक वर्षांपासून हे अनुभवले नाही, पण लेखक त्याच्या लिखाणातून मला परत या अनुभवांकडे घेऊन गेले.

सद्य:स्थितीबद्दलच्या लिखाणात नाराजीचा सूर असला तरी लेखक स्वत: वेगवेगळे प्रयोग करीत आहेत. त्यांची प्रत्यक्ष नाळ मातीशी जोडली गेलेली आहे. त्यामुळे ते मला आशावादी वाटतात. पुस्तक वाचून झाल्यावर त्यातील काही लेख मी माझ्या आठ वर्षांच्या मुलीलाही वाचून दाखवले. तिलाही खूपच आवडले. अनेक नवीन प्रकारची माहिती तिला कळलीच, पण आपल्या आजूबाजूपेक्षा किती निर्सगात विविधता आहे हेही समजले.

पक्ष्यांची, भाज्यांची, झाडांची नुसती नावे ऐकूनही ती अवाक् झाली. 'जंगलातील भटकंती' हा लेख वाचताना तिलाही वाटले की आपण खूप काही मोठ्ठं, महत्त्वाचं असं मिस' करीत आहोत. अजूनही त्याबद्दल प्रश्न विचारणे सुरूच आहे. तिच्या प्रतिक्रियांवरून वाटले की हे पुस्तक मुलांसाठीही महत्त्वाचे आहे. लहानपणापासूनच संवेदना जाग्या झाल्या तर निसर्गाचे संवर्धन करण्यासाठी वेगळे काही करावे लागणार नाही. त्यामुळे ज्यांच्याकडे मुले आहेत, त्यांनी हे पुस्तक जरूर वाचून दाखवावे किंवा वाचावयास द्यावे. या पुस्तकातील लेखांमधून स्वतःच्या अनुभवांच्या दर्शनपटाचा उलगडा केल्याबद्दल लेखकाचे खूप आभार!

**पुस्तक : हरितदृष्टी : जैवविविधता आणि शाश्वत विकासाचे शिक्षण,**
**लेखक : बसवंत विठाबाई बाबाराव**
**प्रकाशन : हरिती आणि वनराई**
**पृष्ठे : २०८**
**किंमत : २५५**

**- विजया कुलकर्णी, पुणे.**

## बोधकथा

# स्वभावात बदल होणे आवश्यक



एके दिवशी आश्रमातील सर्व शिष्य आपल्या गुरूकडे गेले आणि म्हणाले, गुरूजी, आम्ही सर्वजण तीर्थयात्रेला जाणार आहोत..
गुरु :- तुम्ही तीर्थयात्रेला का जाऊ इच्छिता?
शिष्य :- आमच्या भक्तीमध्ये प्रगती व्हावी यासाठी.
गुरु :- ठीक आहे मग जाताना माझ्यासाठी एक काम करा, हे कारले तुमच्या बरोबर न्या. जेथे जेथे ज्या ज्या मंदिरात जाल तेथील देवाच्या पायापाशी ठेवा, देवाचा आशीर्वाद घ्या आणि ते कारले परत आणा.. अशा रीतीने शिष्य आणि ते कारलेही तीर्थयात्रेला प्रत्येक मंदिरात गेले. शेवटी सगळे शिष्य परत आल्यावर गुरु म्हणाले, ते कारले शिजवा आणि मला वाढा... शिष्यांनी ते कारले शिजवले आणि आपल्या गुरूला वाढले.पहिला घास घेताच गुरु म्हणाले, आश्चर्य आहे... शिष्य म्हणाले, 'त्यात काय एवढे आश्चर्यकारक आहे?'
गुरु :- एवढ्या तीर्थयात्रेनंतर कारले अजूनही कडूच आहे.
शिष्य :- पण कडूपणा हा तर कारल्याचा नैसर्गिक गुण आहे. गुरु :- मी तेच म्हणतोय... तुमचा मूळ स्वभाव बदलल्याशिवाय तीर्थयात्रा करुन काहीच फरक पडणार नाही.. म्हणून तुम्ही आणि मी आपणच बदललो नाही, तर कोणीच आपल्या आयुष्यात बदल करु शकणार नाही. जर तुम्ही सकारात्मक विचार कराल तर ध्वनींचे संगीत होईल, हालचालींचे रूपांतर नृत्यात होईल, स्मितहास्याचे रुपांतर खळखळणाऱ्या हास्यात होईल, मन ध्यानस्थ होईल आणि जीवन उत्सव बनेल...!

## जन्म हा अखेरचा

# धर्माचारस्थल - ३



येथे त्वरित ज्ञानलाभ होत असल्यामुळे काशीची महती फार मानली जाते.

काशी दोन प्रकारची आहे. ब्रह्मांडातील काशी पिंडांडातील काशी. ब्रह्मांडातील काशी कुठे आहे? तर उत्तरप्रदेशात, उत्तरवाहिनी गंगेच्या किनाऱ्यावर आहे. उत्तर दिशेकडून आलेली गंगा पुन्हा उत्तर दिशेकडे वाहते. वरुणा आणि अस्सी या दोन नद्यांमध्ये जो भूप्रदेश आहे, त्याला 'वाराणसी' म्हणतात. त्यात गंगा उत्तरेकडे वाहते. येथे गंगा उत्तरवाहिनी असल्यामुळे काशीला फार महत्त्व आलेले आहे. गंगोत्रीपासून सागरात विलीन होईपर्यंत गंगेच्या दीर्घ प्रवाहात लोक स्नान करतात. परंतु काशीत गंगा उत्तरवाहिनी असल्यामुळे उत्कृष्ट मानली जाते. नदी ज्या ठिकाणी उत्तरवाहिनी आणि पश्चिमवाहिनी असते तेथे दिव्य क्षेत्र असते. ही झाली ब्रह्मांडातील काशी. परंतु. प्रत्येकाच्या हृदयात एक काशी असते ती पिंडांडातील काशी होय.

जेथे भगवान विश्वेश्वराचे नित्य वास्तव्य असते ती काशी आहे. जसे संपूर्ण विश्वात विश्वेश्वराचे वास्तव्य आहे. तसेच प्रत्येक जीवात्म्याच्या हृदयात भगवान शिवाचा नित्य निवास असतो. आपल्या हृदयात परमात्मा राहतो, हे ज्ञान ज्याला असते, त्याचे हृदय हे काशीक्षेत्र असते. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# कुटुंबाला वेळ देणे गरजेचे

जगभरात परिस्थिती बदलत असून जीवनशैलीत झालेले बदल, आधुनिकीकरण, शहरीकरण, कौटुंबिक वातावरणात होत असलेले बदल याचा परिणाम मुलांच्या संगोपनावर होत आहे. आताचे बालपण पूर्वीसारखे मजेत जाते का?

आर्थिक परिस्थितीमुळे अनेक मर्यादा येतात. पालकांना नोकरीनिमित्ताने करावा लागणारा प्रवास, कामाचे वाढलेले तास यामुळे वेळ मिळत नाही. मुलांना वेळ द्या, त्यांच्या भावनांचा विचार करा असे सांगितले जाते. कुटुंबातील वातावरण प्रेमळ व चांगले असेल तर बालपण चांगले जाते. यासंदर्भात जाणीव निर्माण व्हावी ही अपेक्षा!!

**- प्रफुल्लचंद्र काळे, नाशिक.**

# केवळ इव्हेंट होऊ नये!

अत्यंत सुलभ भाषेत त्यांनी या घटकांचा परिचय सामान्य वाचकांना करून दिला आहे. अनंत भालेराव काळ आणि कर्तृत्व यासारख्या ग्रंथातून त्यांनी घडवलेले एका साक्षेपी, सत्यनिष्ठ संपादकांचे दर्शन मौलिक स्वरूपाचे आहे. त्यांचा हा ग्रंथ केवळ मराठवाड्याच्याच नव्हे; तर महाराष्ट्राच्या पत्रकारिता क्षेत्रातील एक विचारशिल्पच आहे. त्यांचे या प्रकारचे वैचारिक लेखन आपणास महाराष्ट्राच्या समाजसंस्कृतीचा आरसा दाखवते. शिक्षकीपेशा सोडून ते पुढे न्यायिक क्षेत्रात आले असले तरी, त्यांच्यातील शिक्षक त्यांनी वैचारिक लेखनाच्याद्वारे 'लोकशिक्षकाच्या' भूमिकेतून जिवंत ठेवल्याचे दिसते. वैचारिक आणि ललित अशा दोन्ही आघाड्यांवर यशस्वी झालेले लेखक म्हणून त्यांच्याकडे पाहावे लागते. वैचारिक लेखनाप्रमाणेच त्यांचे ललित लेखनही प्रसिद्ध आहे. दीपमाळ, तुमच्या आमच्या मनातलं, आठवणीतले दिवस, मनातली माणसं या ललित लेखनातून ते वाचकांसमोर आलेले आहेत.

अनेक मान्यवर प्रकाशन संस्थेकडून त्यांची ही पुस्तके प्रकाशित झालेली असून, ती वाचकप्रिय ठरली आहेत. अनेक मान्यवर साहित्य संस्थांचे ते मानद सदस्य आहेत.

महाराष्ट्रातील अनेक व्याख्यानमालेतील एक प्रभावी वक्ते म्हणूनही ते सर्वांना परिचित आहेत. असे चतुरस्र, संवेदनशील व्यक्तिमत्त्व ९६ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावर विराजमान होत आहे, ही घटना आश्वासक आहे. म्हणूनच या संमेलनाचे स्वागत करताना त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन !

वर्धा, पवनार या महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांच्या कर्मभूमीत येत्या फेब्रुवारी महिन्यात हे संमेलन होत आहे. संमेलन म्हटले की उत्सव आलाच, परंतु हा उत्सव जागवताना संमेलनाचा केवळ इव्हेंट होऊ नये. संमेलने होतात, वाजतात, गाजतात परंतु; सामान्य वाचकांच्या हाती ती काय देऊन जातात? हेही महत्त्वाचेच आहे. मागील साहित्य संमेलनामध्ये काही घटकांची घोर निराशा झालेली दिसते. अनेक लोक इथे पुस्तक खरेदीसाठी येतात. वाचकांना साहित्यक्षेत्रातील हेवेदावे आणि इतर भानगडीत पडण्याची आवश्यकता वाटत नाही, त्यांच्या दृष्टीने तिथे होणारी पुस्तकांची आणि लेखकांची भेट महत्त्वाची असते, परंतु सद्यपरिस्थितीत पुस्तकांच्या वाढणाऱ्या किमती, प्रकाशनव्यवहार आणि त्यासंबंधी बाबींच्या वाढलेल्या किमती, त्यावरील कर यासंदर्भात काही ठोस उपाययोजना आणि त्याविषयक चिंतन या व्यासपीठावरून होणे आवश्यक वाटते.

जे प्रकाशक आपल्या पुस्तकासह या संमेलनात सहभागी होतात, त्यांच्याकडून जे भाडे आकारले जाते तेवढी पुस्तकविक्री होत नसेल तर? तर प्रकाशकांनी संमेलनास का जावे? अशी चर्चा मागील संमेलनानंतर घडली होती. प्रकाशकांनी आपल्या न्याय्य मागण्या यापूर्वीच शासनाकडे केल्या आहेत. या व्यासपीठावरून या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधले गेले पाहिजे.

अभिजात भाषेचा प्रश्न मागील दहा वर्षापासून प्रलंबित आहे. सांस्कृतिक प्रश्नाकडे जेव्हा राजकीय भूमिकेतून पाहिले जाते तेव्हाच असे कालहरण होत असते. आपल्या आस्थेच्या केंद्रस्थानी अजूनही सांस्कृतिक व्यवहार आलेले नाहीत. हे यावरून सिद्ध होते. वाचनसंस्कृती, मराठी शाळांची दुरवस्था, व्यावसायिक आणि कौशल्याधिष्ठीत शिक्षणाच्या नावाखाली शिक्षण क्षेत्राचे होणारे खासगीकरण आणि त्यात येणारी भांडवली व्यवस्था, हे खरे आजचे प्रश्न आहेत.




बेकारांची वाढणारी फौज, त्यांची भ्रमनिरास वृत्ती, समाजमाध्यमे आणि आभासीमायेने हरवलेला विवेक, वास्तव, हे आजचे सतावणारे आणि अस्वस्थ करणारे प्रश्न आहेत. हाताला काम नसेल, पोटात भूक असेल तर सांस्कृतिक उन्नती कशी होणार? सामाजिक, राजकीय प्रश्न म्हणून या प्रश्नापासून साहित्याला, साहित्यिकांना पलायन करता येईल का? सामाजिक, कौटुंबिक स्थिरतेशिवाय सांस्कृतिक समृद्धीची कोणती स्वप्ने आपणास पाहता येतील, प्रश्न अनेक आहेत. ते सर्वच या व्यासपीठावर उपस्थित होतील असेही नाही, परंतु साहित्य संमेलनाचे व्यासपीठ हे भाषा, साहित्य संस्कृतीच्या जागराचे व्यासपीठ असते. समाजसंस्कृतीचे आणि साहित्याचे नाते तर अन्योन्य असेच. त्यामुळे साहित्य संमेलनाचे विद्यमान अध्यक्ष न्यायिक, सत्यशील भूमिकेतून, महात्मा गांधींच्या या कर्मभूमीतून या विषयाचा जागर करतील असा या निमित्ताने सार्थ विश्वास वाटतो.

**- अशोक लिंबेकर.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनीच्या कामाला सुरुवात

## ३५ कि.मी. जागेचे झाले सर्वेक्षण : ढेंगळे-पाटील यांची माहिती

सुराज्य/सोलापूर

उजनी ते सोलापूर दुहेरी जलवाहिनीच्या कामाला सुरुवात झाली आहे. ३५ किलोमीटर सर्व्हे चे काम पूर्ण झाले आहे. २१ महिन्यात दुहेरी जलवाहिनीचे काम पूर्ण होईल अशी माहिती स्मार्ट सिटीचे सीईओ त्रिंबक ढेंगळे पाटील यांनी दिली.

सोलापूर महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांना भेटण्यासाठी महापालिकेत आले असता स्मार्ट सिटी चे सीईओ त्रिंबक ढेंगळे पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना ही माहिती दिली. सोलापूर ते उजनी या दुहेरी जलवाहिनीच्या तब्बल ६३५ कोटींच्या कामाची नवीन निविदा काढण्यात आली आहे. कोल्हापूरच्या लक्ष्मी कंपनीला या कामाचा मक्ता देण्यात आला आहे. यापूर्वी ही जलवाहिनीसाठी निविदा पोचमपाड कंपनीला देण्यात आली होती मात्र तो मक्तेदार गेल्यामुळे दुसऱ्यांदा निविदा काढण्यात आली.



दरम्यान, यापूर्वी रस्त्याच्या उजव्या बाजूने ही जलवाहिनी टाकण्यात येणार होती. मात्र आता रस्त्याच्या डाव्या बाजूने जलवाहिनी टाकण्यात येत आहे. त्यामुळे या जागेचे पुन्हा नव्याने सर्व्हेक्षण करण्यात येत आहे. एकूण ९० किलोमीटर पैकी आतापर्यंत ३५ किलोमीटर सर्व्हेक्षणाचे काम पूर्ण झाले आहे. यामध्ये दोन ठिकाणी रेल्वे क्रॉसिंग, कॅनॉल, ब्रिज, ऑप्टिकल फायबर असे काही किरकोळ अडथळे आहेत. लवकरात लवकर हे अडथळे दूर करून कामास सुरुवात होईल, असे ढेंगळे पाटील यांनी सांगितले. कोणत्याही परिस्थितीत २० महिन्यात हे काम पूर्ण होईल असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, त्याचबरोबर जॅकवेलचे कामही सुरू राहणार आहे. येथे साडेतीन महिन्यात जॅकवेलचे काम होईल असेही ते म्हणाले.

### १४ पैकी ८ स्मशानभूमीचे नूतनीकरण पूर्ण

स्मार्ट सिटी योजनेंतर्गत सोलापूर शहरातील १४ स्मशानभूमीचे नूतनीकरण व सुशोभीकरणाचे काम सुरू आहे. या पैकी ८ स्मशानभूमीचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित हे काम लवकरच पूर्ण होणार आहे. जुना पुना नाका स्मशानभूमीतील दाहिनीचे काम ही पूर्ण झाले आहे. ट्रान्सफॉर्मरची व्यवस्था झाल्यानंतर ही दाहिनी सुरू करण्यात येईल अशी माहिती स्मार्ट सिटीचे सीईओ त्रिंबक ढेंगळे पाटील यांनी दिली.

### दर पंधरा दिवसांनी आढावा घेणार : आयुक्त

उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनी काम नियोजित वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे. यामुळे शहराच्या पाण्याचा प्रश्न मिटणार आहे. महापालिका स्तरावर या कामाचा दर पंधरा दिवसांनी आढावा घेण्यात येणार असल्याचेही महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी यावेळी सांगितले.



## मित्रप्रेम रुग्णालयांमध्ये बालदिनी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

**सुराज्य/माढा** : सहकार महर्षी गणपतराव साठे प्रतिष्ठान संचालित मित्रप्रेम मल्टीस्पेशालिटी चॅरिटेबल हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर व ग्रामीण रुग्णालय माढा च्या बाल आरोग्य यंत्रणेच्या संयुक्त विद्यमानाने भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंती निमित्त बालदिनाचे औचित्य साधून ० ते १८ वयोगटातील मुलांचे भव्य आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये एकुन २५३ पेशंट ची तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली मोफत तपासणी करण्यात आली. यामध्ये दंतरोग-२९, अस्थीरोग-३५, मेंदूरोग-१%, हृदयाची सोनोग्राफी २ऊ एउक्ज -२८ व जनरल १४४ मुलांची तपासणी करण्यात आली. या शिबिरासाठी श्री. संत कूर्मदास साखर कारखान्याचे संचालक संस्थेचे ट्रस्टी मा. श्री. दादासाहेब साठे, माढा नगरीच्या नगराध्यक्षा अँड. सौ. मिनलताई दादासाहेब साठे, उपनगराध्यक्षा सौ. कल्पनाताई जगदाळे, डॉ. विकास मस्के, शल्यचिकित्सक डॉ. सुनिल तडवळकर, मेंदूरोगतज्ज्ञ डॉ. श्रीगणेश पाटील, अस्थीरोगतज्ज्ञ डॉ. संतोष ताठे, दांतरोगतज्ज्ञ डॉ. अमरसिंह नवले, डॉ. विद्यादेवी तोडेकर, डॉ. स्नेहा गायकवाड-मस्के, डॉ. सागर पाटील, वेदांत(भैय्यासाहेब) साठे आरोग्य सभापती. विकास साठे, बांधकाम सभापती. अरुण कदम, पाणीपुरवठा सभापती. नितीन साठे, नगरसेवक अजिनाथ माळी, नगरसेविका सुनिता राऊत, वंदना लंकेश्वर, रेश्मा लंकेश्वर. निर्मला थोरात मोहिनी नेटके. गीतांजली देशमुख, रोटरी क्लबच्या अध्यक्षा संगीता पाडुळे चंद्रकांत कांबळे. धनाजी वसेकर. शिवाजी(आण्णा)जगदाळे, श्री. नितीन साठे,. हनुमंत राऊत व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत यशस्वीपणे पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मण राऊत यांनी तर आभार प्रदर्शन समाधान लटके यांनी केले.

## रत्नाई कृषी महाविद्यालयातर्फे पिसेवाडीत कृषी सल्ला केंद्र

**सुराज्य/वेळापूर** : शिक्षण प्रसार मंडळ अकलूज संचलित रत्नाई कृषी महाविद्यालय अकलूज संलग्न महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी यांच्यावतीने ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम २०२२-२३ पिसेवाडी तालुका माळशिरस येथे कृषी सल्ला केंद्राचे उद्घाटन पिसेवाडी सरपंच मोनिका शेंडे, उपसरपंच मोहन भाकरे, ग्रामसेवक सचिन बनकर, आरोग्यविभागाच्या अधिकारी डॉ. स्नेहा पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य व पिसेवाडी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कृषी सल्ला केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना पिसेवाडी सरपंच मोनिका शेंडगे म्हणाल्या या कृषी सल्ला केंद्राचा पिसेवाडी परिसरातील अनेक गावातील शेतकऱ्यांना फायदा होणार आहे, या कृषी सल्ला केंद्रामार्फत सर्व शेतकरी बांधवांना मार्गदर्शन घेऊन त्याचा उपयोग करावा, असे अवाहन केले. अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील, रत्नाई कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य आर जी नलावडे, कार्यक्रम समन्वयक प्रा. एस एम एकतपुरे, यांच्या मार्गदर्शनानुसार कृषिकन्या स्वप्नाली गोदे, साक्षी भोसले, कीर्ती धादवड, तृप्ती भंडारे, श्रध्दा गाटे, अनुराधा घोडके, प्राजक्ता पवार यांनी कृषी विषयक मार्गदर्श कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

## जगजीवनराम झोपडपट्टी येथे गळफास घेऊन आत्महत्या

**सुराज्य/सोलापूर** : सदर बझार परिसरातील जगजीवनराम झोपडपट्टी राहणाऱ्या सचिन लहू काळे (वय ४२) याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सोमवारी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली. सचिन काळे याच्या मृतदेह काल सायंकाळी फेट्याच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेची नोंद सदर बझार पोलिसात झाली. दारूच्या नशेत त्याने आत्महत्या केली. अशी नोंद सदर बझार पोलिसात झाली. हवालदार जमादार पुढील तपास करीत आहेत.

**अति मद्यप्राशन केल्याने मृत्यू**

शहरातील अशोक चौक परिसरात राहणारा नागेश महादेव विटकर (वय ३७) हा अति मध्य प्राशन केल्याने मरण पावला. रविवारी रात्री तो घराजवळ मद्य प्राशन केल्याने बेशुध्दावस्थेत सुध्दा आढळला होता. त्याला वडिलांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान तो मंगळवारी दुपारी मरण पावला. या घटनेची नोंद जेल रोड पोलिसात झाली आहे.

**उस्मानाबाद येथील जखमीचा मृत्यू**

दुचाकीच्या अपघातामध्ये जखमी झालेले सुरज अल्लाउद्दीन मुजावर (वय ४५ रा. तडवळा जि. उस्मानाबाद) हे सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना मंगळवारी दुपारी मरण पावले. रविवारी सायंकाळच्या सुमारास ते गावात पायी रस्ता ओलांडत होते. त्यावेळी दुचाकीच्या धडकेने गंभीर जखमी झाले होते. त्यांना उस्मानाबाद येथे प्राथमिक उपचार करून दुसऱ्या दिवशी सोलापुरात दाखल केले होते. अशी नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

**विष पिऊन तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न**

वाळुज देगाव (ता. मोहोळ) येथे राहणाऱ्या उमेर नासिर शेख (वय २७) याने घरात विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. मंगळवारी सकाळी हा प्रकार घडला. त्याला मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून गुलशन शेख (आत्या) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. यामागचे कारण समजले नाही. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

**प्रियकराचा त्रास; आत्महत्येचा प्रयत्न**

विवाहपूर्वीचा प्रियकर सतत त्रास देत असल्याने एका ३० वर्षीय विवाहितेने विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केली. ही घटना दक्षिण सोलापूर परिसरात आज मंगळवारी सकाळच्या सुमारास घडली. तिला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

## ऊस पिकातील खोडवा व पाचट व्यवस्थापन अभियानास सुरुवात

सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र शासन कृषि आयुक्तालयाच्या निर्देशानुसार सोलापूर जिल्ह्यामध्ये ऊस पिकातील खोडवा व पाचट व्यवस्थापनकरीता जनजागृती मोहिम मंगळवार, दि. १५ नोव्हेंबर २०२२ ते १५ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने शबरी कृषि प्रतिष्ठान, सोलापूर संचलित कृषि विज्ञान केंद्र, सोलापूरतर्फे खोडवा व पाचट व्यवस्थापन अभियानाचा शुभारंभ ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन करून करण्यातआले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कृषि विज्ञानकेंद्र, सोलापूरचे वरीष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. लालासाहेब रा. तांबडे होते. तर प्रमुखमार्गदर्शक म्हणून राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प सोलापूरचे मृदाशास्त्रज्ञ डी. बी. भानवसे होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रास्ताविकात विषय विशेषज्ञ प्रदिप गोंजारी यांनी ऊस पिकापैकी जवळपास ३५ ते ४० टक्के क्षेत्र खोडवा पिकाचे आहे. पंरतु उत्पादन मात्र ३० टक्के इतके अल्प आहे. त्यामुळे उत्पादकता वाढीसाठी खोडवा व्यवस्थापन गरजेचे असल्याचे सांगितले कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मार्गदर्शनात बोलताना प्रमुख शास्त्रज्ञ यांनी शेतकऱ्यांना उशिरा म्हणजे १५ फेब्रुवारीनंतर तुटलेल्या ऊसाचा खोडवा ठेवू नये. जितका जास्त ऊशिरा ऊस तुटेल तितकी खोडवा उत्पादनात घट होईल. खोडवा ऊसाचे व्यवस्थापन करताना पाचट जाळू नये. पाचट शेताबाहेर न काढता सरीत दाबून घ्यावे बुडख्यावर पाचट ठेऊ नये बुडके मोकळे करावेत जेणेकरून नवीन फुटनारे कोंब जोमदार येतील त्यांना ऊन मिळेल तसेच सरीत दाबून ठेवलेल्या पाचट व्यवस्थापासाठी हेक्टरी ८० किलोनत्र १०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट टाकावे व त्यानंतर १० किलो पाचट कुजविणारे जिवाणू ओलसर मातीमध्ये मिसळून समप्रमाणात पसरून टाकावे असे सांगितले.



## मनाशिवाय देहाचे कार्य अशक्य : सिध्देश्वर महास्वामी

सुराज्य/अक्कलकोट

आपल्या देहाचे डोळे हे पाहण्याचे काम करते, जीभ बोलण्याचे काम करते, हात काम करण्याचे तर पाय चालण्याची क्रिया करीत असले तरी हे आपल्या देहातील मनाशिवाय कार्य करणे शक्य नसल्याचे सांगून मृत व्यक्तींच्या सर्व अवयव असताना अंर्तमन नसल्यामुळे देह निष्क्रिय झालेला असल्याचे आंतरराष्ट्रीय प्रवचनकार प. पू. श्री. अभिनव गवी सिध्देश्वर महास्वामीजी (कोप्पळ) यांनी मैंदर्गी येथील श्री शिवचलेश्वर मंदिराच्या प्रांगणात आयोजित आध्यात्मिक प्रवचन कार्यक्रम प्रसंगी बोलत होते.

पुढे बोलताना प. पू. श्री. अभिनव गवी सिध्देश्वर महास्वामीजी (कोप्पळ) यांनी म्हणाले, प्रत्येकाच्या जीवनात सुख आणि दुख विनाकारण घडत नसतात. त्या काही कारण असतात आणि त्याचे कार्य मन हेच करीत असते. सुर्याशिवाय जसे पृथ्वी चालु शकत नाही तसे देहामध्ये मन असल्याशिवाय हालचाल करु शकत नाही. व आपण सर्वजण या जगात यात्रेकरू म्हणून आलो आहोत. आपण सर्वांनी येथे तीन दिवस राहून आरामात जावे. आमच्यासाठी हा तीन दिवसांचा उत्सव आहे. येथे कोणीही कायमचे राहत नाही. जे येतात त्यांनी एक दिवस जावे. त्यामुळे आपण सर्वांनी यात्रेकरू म्हणून जगावे. आपले जीवन सुंदर आहे. जगायला शिकले पाहिजे जन्म हे देवाने दिलेले आमंत्रण आहे. आपण जमविलेल्या मायाची संपत्ती हे मेल्यावर सोबत येत नसते. हे लक्षात ठेवून प्रत्येकांनी जीवन जगले पाहिजे आणि तेही देवाला आवडेल असेच जगले पाहिजे. जीवनात जय-पराजय, गरिबी-श्रीमंती आले तरी आपण धैर्याने व शौर्याने जगले पाहिजे. शिव म्हणजे सत्कर्म करणे, अचल म्हणजे खंबीरपणे उभे राहणे, शिवचलेश्वर म्हणजे एकाग्रतेने उभे राहणे, शिव आपल्या देहात आहे. जे चांगले कार्य करतात त्यांनाच शिवाचा आशीर्वाद मिळतो, असे सांगून त्यांनी उपस्थित श्रोत्यांना मैंदर्गी ग्रामदैवत शिवचलेश्वरांचे आत्मदर्शन घडविले.

## संगप्पा बिराजदार यांच्या पुतळ्याचे अनावरण

सुराज्य/सोलापूर

लोकनेते मा. . नगरसेवक शिवण्णा संगप्पा बिराजदार-पाटील यांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधुन कृषीमहर्षी संगप्पा बिराजदार यांच्या पुतळ्याचे अनावरण शेळगी भागातील एस. के. बिराजदार प्रशालेत करण्यात आले. या कार्यक्रमास खा. जयसिध्देश्वर शिवाचार्य महास्वामी, शिवण्णा बिराजदार-पाटील, सोमशेखर बिराजदार-पाटील, प्रकाश बिराजदार-पाटील, बसवराज बिराजदार-पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती.




खा. जय सिध्देश्वर शिवाचार्य महास्वामी यांनी कृषी महर्षी कै संगप्पा कलप्पा बिराजदार पाटील यांनी आपल्या कुटुंबावर केलेले संस्कार खूप काही सांगून जातात. बिराजदार पाटील कुटुंब व. आपले नाते अतुट आहे आदरणीय शिवण्णा बिराजदार पाटील यांचे. कार्य हे खुप कौतुकास्पद असल्याचे सांगितले. यावेळी माजी नगरसेवक चंद्रकांत रमणशेट्टी- यांनी शेळगी हदवाढ भागात शिवण्णा बिराजदार यांनी अनेक विकासकामे केल्याचे सांगितले. राजेश उबाळे -यांनी आम्ही सदैव बिराजदार पाटील कुटुंबाच्या सोबतीत राहु, असे सांगितले. राजशेखर रोडगीकर यांनी शिवण्णा बिराजदार यांचे शैक्षणिक क्षेत्रातील काय मोलाचे असल्याचे सांगितले. शिवण्णा बिराजदार-पाटील यांनी. शेळगीचा विकास हेच ध्येय ठेवून काम केल्याचे सांगितले. का करत असताना सर्वांचे सहकार्य लाभले. मी वयाने थकलो असेल पण विचाराने. कधी थकणार नाही यापुढे हि मी असचे सदैव जनसेवा करत राहणार असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन प्रशालेचे मुख्याध्यापक मा गुरूनाथ वांगकर यांनी केले. आभार प्रदर्शन मा अमरनाथ बिराजदार- पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बिराजदार प्रशाला शिक्षकांनी परिश्रम घेतले. यावेळी शेळगी भागातील नागरिक उपस्थित होते.

## प्रा.डॉ. साठे यांना मुक्ता फाउंडेशनचा राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

सुराज्य/वेळापूर

उघडेवाडी तालुका माळशिरस येथील रहिवासी व रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर येथे इंग्रजी विभागात प्राध्यापक म्हणून आणि राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभाग सोलापूर जिल्हा अध्यक्ष प्रा. डॉ. धनंजय साठे यांना सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल मुक्ता फाउंडेशनचा गणूजी शिवाजी राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे.



सदर पुरस्कार मुक्ता फाउंडेशन यांच्यावतीने दिनांक सोमवार २८ नोव्हेंबर २०२२ रोजी दुपारी १२. ०० वाजता राजर्षी शाहू स्मारक भवन दसरा चौक कोल्हापूर येथे प्रमुख पाहुणे डॉ. भारत पाटणकर, प्रा. डॉ. नारायण कांबळे, मयूर सरसेर, विशाल लोंढे, भरत घाडगे, मुक्ता खफाउंडेशन चे अध्यक्ष अमोल महापुरे आदी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. प्रा. डॉ. धनंजय साठे यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर, राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभाग प्रदेशाध्यक्ष व माजी आमदार जयदेवराव गायकवाड, प्रदेश उपाध्यक्ष पंडित कांबळे अशोकराव गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश कार्यकारणी सदस्य वसंतराव पाटील, बाळासाहेब धाईंजे, विकासदादा धाईंजे, साजिद सय्यद, तानाजी जगदाळे, विमलताई जानकर, जावेद मुलाणी, काकासाहेब जाधव, भैय्यासाहेब बाबर, रायचंद खाडे, राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभाग तालुकाध्यक्ष रजनीश बनसोडे, जीवन जानकर, पं. स. सदस्य अजय सकट, राष्ट्रवादी काँग्रेस महिला जिल्हा उपाध्यक्षा अश्विनी भानवसे, राष्ट्रवादीचे नेते संदीपतात्या माने देशमुख, मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब घाडगे, संजय देशपांडे, विनायक माने, आदींनी अभिनंदन केले आहे.

## रुई येथे शेतकऱ्याचे १ लाख ७५ हजारांचे सोयाबीन पळवले

सुराज्य/वैराग

रुई (ता. बार्शी) येथे राहणाऱ्या एका शेतकऱ्याच्या घरासमोरील १ लाख ७५ हजार रुपये किमतीचे सोयाबीन पळविले. ही चोरी सोमवारी पहाटेच्या सुमारास घडली. रुई येथील भाऊसाहेब ज्ञानदेव केंडे हे शेतकरी प्रत्येकी ५० किलोचे सोयाबीन गोणीत भरून एकूण ७० पिशव्या आपल्या घरासमोर आदल्या दिवशी ठेवले होते. सोमवारी पहाटेच्या सुमारास चोरट्याने ते पळवून नेले.

**उपळवटे येथे आईला दगडाने मारहाण**

टेंभूर्णी-बहिणीला आपल्या सोबत कामावर का पाठवत नाही या कारणावरून वृध्द आईला हाताने तसेच दगडाने मारून जखमी केल्याची घटना उपळवटे (ता. माढा) येथे सोमवारी सकाळच्या सुमारास घडली. मीना शामराव उर्फ बबन सपाटे (वय ६० रा. उपळवटे) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. त्यांच्या फिर्यादीवरून ज्योतीराम सपाटे (मुलगा) याच्याविरुध्द टेंभुर्णीच्या पोलिसांनी गुन्हा दाखल केला. काल सकाळच्या सुमारास मीना सपाटे या आपली मुलगी सोनाली हिच्या सोबत शेतात मक्याचे पीक काढत होत्या. त्यावेळी ज्योतीराम याने बहीणीला माझ्यासोबत शेतात कामासाठी का पाठवत नाही. असे म्हणत त्यांना हाताने मारहाण केली. आणि दगडाने डोक्यात मारल्याने त्या जखमी झाल्या.

# महापौर चषकाच्या टी-शर्टचे आयुक्तांच्या हस्ते अनावरण

## ८ संघांचा सहभाग

सुराज्य/सोलापूर

महापालिका आणि जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने घेण्यात येणाऱ्या महापौर चषकाच्या टी-शर्टचे अनावरण मंगळवारी महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पालिका उपयुक्त मच्छिंद्र घोलप, जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे चंद्रकांत रेम्बर्सू, नागेश वल्याळ यांच्यासह संघाचे कर्णधार उपस्थित होते. पार्क मैदानावर महापौर चषकाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महापौर चषकामध्ये आठ संघांनी सहभाग नोंदवला आहे. यामध्ये माऊली वॉरियर्स, बंसल लायन्स, स्वस्तिक किंग, आकांक्षा ईगल्स, मनोरमा मास्टर्स, सहारा रायडर्स, अजिंक्यतारा चॅलेंजर्स, आपटे टायगर या संघाचा समावेश आहे. लवकरच हा चषक सुरू होणार आहे. मंगळवारी महापालिका आयुक्तांच्या कक्षात या चषकाच्या टी-शर्टच्या अनावरण करण्यात आले. यावेळी महापालिका आयुक्तांनी या चषकास शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी प्रकाश भुतडा, शिवा आकलूजकर, दिलीप आव्हाड, राजेंद्र गोटे, कर्णधार दिपक राजूल, चेतन नराळ, निखिल मादास, आझहर आलगुर, आनंद शेलार, सनत माळगे, समीर शेख, प्रविण देशेट्टी, आणि सचिव चंदू रेंबर्सू उपस्थित होते.




### पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन होणार

महापौर चषकाचे उद्घाटन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते करण्याचे नियोजन करण्यात आले आहे तसे पत्र त्यांना देण्यात आले आहे. त्याच वेळी पार्क मैदानाचेही उद्घाटन करण्यात येईल. ३ डिसेंबर रोजी महाराष्ट्र आणि सिक्कीम विरुध्दचा सराव सामना होत आहे. त्या सराव सामन्याला एमसीएच्या निर्देशाप्रमाणे या काही सुविधा लागणार आहे. महापालिकेच्या वतीने त्या लवकरात लवकर पुरवण्यात येतील असेही आयुक्त पी शिवशंकर यांनी दिली.

### चौपाटी हलविण्याची कार्यवाही न्यायालयाच्या निकालानंतरच

पार्क चौपाटी येथील जागा स्पार्क स्टेडियम सामन्यावेळी पार्किंग साठी उपलब्ध करण्यात येत आहे परंतु पार्क चौपाटी जागा प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. न्यायालयाच्या निकालानंतरच या संदर्भात पुढील कार्यवाही करता येणार आहे. दरम्यान, चौपाटी संदर्भातलं प्रकरण लोक अदालतमध्ये सोडविण्याचा प्रस्ताव संबंधित विक्रेत्यांकडे ठेवला होता मात्र त्यांनी तो मान्य केला नाही. यामुळे आता न्यायालयाच्या निकालानंतरच पुढील कार्यवाही करण्यात येईल असेही महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी स्पष्ट केले.

## निधन वृत्त

### बसवराज अष्टगी



**सुराज्य/सोलापूर** : पूर्व मंगळवार पेठेतील प्रतिष्ठीत व्यापारी व सिध्देश्वर देवस्थान पंच कमिटीचे विश्वस्त बसवराज महादेवप्पा अष्टगी (वय ६१) यांचे मंगळवारी अल्पशा आजाराने निधन झाले. ते महेश अर्बन को-ऑप. बँकेचे ते माजी संचालक होते. त्यांच्या पश्चात पत्नी, विवाहित मुलगा, तीन मुली, सुन व नातवंडे असा परिवार आहे.

# दिलीप कोल्हे यांचा आज मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत 'वर्षा'वर शिंदे गटात प्रवेश

## जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांच्या प्रयत्नाला अखेर यश

**सुराज्य/सोलापूर**

राष्ट्रवादीचे माजी उपमहापौर दिलीप कोल्हे यांची मनधरणी करण्यात राष्ट्रवादीला अखेर अपयश आले आहे राष्ट्रवादीची कार्याध्यक्ष पदाची ऑफर धुडकावून दिलीप कोल्हे हे आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटात वर्षा निवासस्थानी जाहीर प्रवेश करणार आहेत त्या प्रवेशाच्या वेळी आरोग्य मंत्री तानाजी सावंत जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजी सावंत यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश करत हा त्या मनगटी बांधले घड्याळ काढत हाती शिंदे गटाचा झेंडा घेणार आहेत

राष्ट्रवादी मधील अंतर्गत गटबाजीला कंटाळून तसेच जुनी आणि नव्या वादाला कंटाळून राष्ट्रवादीचे उपमहापौर दिलीप कोल्हे हे राष्ट्रवादीचे घड्याळ काढून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटात जाहीर प्रवेश करणार असल्याचे जाहीर केले होते. मात्र अद्याप त्यांचा जाहीर प्रवेश झाला नव्हता कोल्हे यांची राष्ट्रवादीकडून मनधरणी करण्याचा प्रयत्न चालू होता त्यांना प्रदेश पातळीवर मोठ्या पदावर संधी देण्याची प्रक्रिया चालू होती मात्र दिलीप कोल्हे यांनी राष्ट्रवादीची सर्व ऑफर धुडकावून लावत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटात जाहीर प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे आज बुधवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वषा निवासस्थानी दिलीप कोल्हे शिंदे गटात जाहीर प्रवेश करणार आहेत यावेळी आरोग्य मंत्री तानाजी सावंत सोलापूर जिल्ह्याचे संपर्कप्रमुख प्रा. शिवाजी सावंत जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांच्यासह सोलापूरचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.



दिलीप कोल्हे हे राष्ट्रवादीमधील अंतर्गत गटबाजीला कंटाळले होते शहरातील पदाधिकाऱ्यांवर आरोप करत आपण लवकरच राष्ट्रवादीमध्ये शिंदे गटांमध्ये प्रवेश करण्यात असल्याचे जाहीर केले होते त्यानुसार त्यांच्या प्रवेशाची तारीख अद्याप निश्चित झाली नव्हती मात्र शिवसेनेचे शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी अथक परिश्रम करून अखेर दिलीप कोल्हे यांना आपल्या गटांमध्ये आणण्याचा प्रयत्न यशस्वी केला आहे दिलीप कोल्हे यांचा शिंदे गटातील प्रवेशाची प्रवेश रोखण्यासाठी राष्ट्रवादीकडून कोल्हे यांना मोठी ऑफर देण्यात आली होती त्यांना प्रदेश पातळीवर मोठे पद देण्याची तयारी देखील चालीवर तयारी चालू होती मात्र सर्व राष्ट्रवादीच्या ऑफर धोकावून लावत अखेर कोल्हे हे आज बुधवारी शिंदे गटाचा झेंडा आपल्या हाती घेणार आहेत आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोल्हे यांचा शिंदे गटांमध्ये प्रवेश हे मोठी राजकीय उलाढाल मानली जात आहे राष्ट्रवादीला हा मोठा दणका मानले जात आहे.

> दिलीप कोल्हे यांच्यासारखे मोठे नेते जर शिंदे गटा मध्ये प्रवेश करत असेल त्यांच्या स्वागत आहे त्यांच्या प्रवेश साठी आपण खूप प्रयत्न केला अखेर कोल्हे यांचा प्रवेश आज होणारा असल्याने त्यांच्या प्रवेशाचे शिंदे गटांमध्ये स्वागत आहे. कोल्हे यांच्यामुळे सोलापुरात शिंदे गट आणखी बळकट होण्यास मदत होणार आहे.
>
> **– अमोल शिंदे**
> (जिल्हाप्रमुख शिवसेना शिंदे गट)

> राष्ट्रवादीच्या अंतर्गत गटबाजीमुळे अनेक शिंदे गटांमध्ये प्रवेश करणार आहेत त्यानुसार आपण आज बुधवारी सायंकाळी सात वाजता मुख्यमंत्री निवासस्थानी आपला जाहीर प्रवेश मुख्यमंत्र्यांचे उपस्थित होणार आहे आपल्या प्रवेशानंतर राष्ट्रवादी मधील अंतर्गत गटबाजीचे राजकारण जनतेसमोर आणू
>
> **– दिलीप कोल्हे** (राष्ट्रवादी नेते)

## सीईओ स्वामी यांनी कारवाईचा बडगा उगारला

**सुराज्य/सोलापूर** : जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागातील लिपीक राजू गाडेकर, आणि संजय कांबळे यांच्यासह विविध विभागातील कर्मचाऱ्यांची तडका फडक उचलबांगडी करण्यात आली आहे. बहूचर्चीत आणि तक्रार असणाऱ्या तब्बल २० कर्मचाऱ्यांची मुख्यालयातंर्गत बदली करण्याची कारवाई सीईओ दिलीप स्वामी यांनी केली आहे.



याबाबत डेप्युटी सीईओ चंचल पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार प्राथमिक शिक्षण विभागाच्या लाच प्रतिबंध कारवाई नंतर सीईओ स्वामी यांनी कडक धोरण अंमलात आणले आहे. वादग्रस्त आणि एकाच टेबलावर ५ वर्षापेक्षा अधिक कार्यासन करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या तडकाफडकी बदली मुख्यालयातंर्गत करण्यात आली आहे. कनिष्ठ प्रशासनधिकारी २, वरिष्ठ सहाय्यक ०३, कनिष्ठ सहाय्यक १५ आशी बदली करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची आकडेवारी आहे. सोलापूर जिल्हा परिषदेतील शिक्षण विभागात झालेले लाचेचे प्रकरण तसेच इतर काही कारणांमुळे झेडपीतील कामाच्या पध्दतीत बदल करण्यात आला आहे.

> कामानिमित्त आलेल्या व्यक्तींनी कोणत्याही कर्मचाऱ्यांना न भेटता थेट अधिकारी यांनाच भेटावे असे आदेश सीईओ दिलीप स्वामी यांनी प्रशासनाला दिले त्यामुळे मागील दोन दिवसापासून कार्यालयीन कामकाजामध्ये शिस्तीचे वातावरण दिसत आहे.



## नातेपुते पोलीस ठाण्यातर्फे वाहनांना मोफत रिफ्लेकटर

**सुराज्य/नातेपुते** : अहिंसा सेवा समिती व नातेपुते पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नातेपुते येथे ट्रॅक्टर, ट्रेलर व मोटारसायकलला रिफ्लेक्टर बसविण्यात आले. नातेपुते पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे व अहिंसा सेवा समितीचे संस्थापक अध्यक्ष नगरसेवक अविनाश दोशी यांच्या हस्ते सदर रिफ्लेक्टर बसविण्याचे उद्घाटन करण्यात आले. सध्या उसाचे कारखाने व रस्त्याची कामे चालू असल्याने रात्री अपघात घडू नये यासाठी हा स्तुत्य उपक्रम राबविला जात आहे. याबाबत सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे म्हणाले, पोलीस अधिक्षक शिरीष देशपांडे, अप्पर पोलीस अधिक्षक हिम्मत जाधव, उपविभागीय अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे यांच्या मार्गदर्शनाखाली रात्री अपघात होऊ नयेत याची दक्षता म्हणून संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवीत आहोत. याबाबत अहिंसा सेवा समिती संस्थापक - अध्यक्ष, नगरसेवक अविनाश दोशी म्हणाले, अहिंसा सेवा समितीच्या वतीने सध्याची ऊस वाहतुकीची गर्दी, अंधारात वाहने दिसून येत नाहीत, त्यामुळे अपघात होऊ नयेत. यासाठी वाहनांना रिफ्लेक्टर व रेडियम लावण्याचा प्रारंभ करून जवळपास ४०० वाहनांना मोफत रिफ्लेकटर लावण्यात आले. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे, अहिंसा सेवा समिती अध्यक्ष नगरसेवक अविनाश दोशी, राजेंद्र डुडू, महावीर दोशी, अतुल १ दोशी, अभिनंदन दोशी, विनोद दोशी, महेश दावडा, चंद्रसेन डुडू, रविंद्र दावडा, दिपक दोशी, दिपक गांधी, दर्शन गांधी, संजय गांधी, - तेजस चकेश्वरा, पो. कॉ. कृष्णा हंगे, विश्वास जानकर आदीसह सेवा समिती सदस्य, पोलीस कर्मचारी उपस्थित होते

## स्वातंत्र्यसैनिक बिरसा मुंडा यांची जयंती अक्कलकोट येथे साजरी

**सुराज्य/अक्कलकोट** : सी बी खेडगी महाविद्यालय मध्ये आपल्या देशामधील एक प्रामाणिक प्रयत्नवादी असलेल व स्वातंत्र्वय लढ्यातील क्रांतिकारी आदिवासी समुदयांचे प्रतिनिधित्व करणार आर्थिक व सामाजिक कल्याणासाठी झटणार व्यक्तिमत्व व स्वातंत्र्वय चळवळीला वाहून घेतलेलं एक थोर क्रांतिकारी स्वातंत्र्य सैनिक भगवान बिरसा मुंडा यांची १४७ वी जयंती आदिवासी गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला. प्रारंभी या कार्यक्रमाचे स्वागत प्रा. विठ्ठल वाघमारे यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवराय आडवीतोट यांच्या हस्ते भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक डॉ. गणपतराव कलशेट्टी. यांनी केले त्यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये थोर स्वातंत्र्वय सैनिक भगवान बिरसा मुंडा यांचे भारतीय स्वातंत्र्वय चळवळीतील एक महत्त्वपूर्ण योगदान व त्यांचा क्रांतिकारी प्रवास याबाबत विचार व्यक्त केले. तसेच प्राचार्य डॉ. शिवराय आडवितोट यांनी भगवान बिरसा मुंडा यांचे जीवन चरित्र व कार्यपध्दती कौटुंबिक पार्श्वभूमी संघटन शक्ती एक महान योध्दा प्रामाणिक व अन्यायविरुध्द क्रांती करणार आकर्षक व्यक्तिमत्व यासारखे अनेक कृतीदायी पैलूंवर विचार व्यक्त केले. या प्रसंगी डॉ. आय एम खैरादी. डॉ. सिध्दार्थ मुरूमकर प्रा. सिध्दाराम पाटील प्रा. विठ्ठल वाघमारे प्रा. एस एम अर्जुन प्रा. हारकुड मॅडम कार्यालय प्रमुख श्री रतन बाबशेट्टी श्री प्रदीप हिंडोळे श्री प्रशांत कडबगावकर श्री दिनेश धाराशिवकर श्री राजू चव्हाण इत्यादींनी उपस्थित राहून सहकार्य केले. या वेळी सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी व विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार डॉ. सिध्दार्थ मुरूमकर यांनी मानले व संयोजन प्रा. आबाराव सुरवसे यांनी केले.



## अशपाक मुलाणी यांचा निवडीबद्दल सत्कार

**सुराज्य/वेळापूर** : वेळापूर येथील अशपाक दिलावर मुलाणी यांची माळशिरस तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या खजिनदार बिनविरोध निवड, झाली आहे. त्याबद्दल अशपाक मुलाणी यांचा रिपाई माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी माजीद मुलाणी, निसार शेख, अमर आतार, फिरोज पठान, अभिजीत लावंड, कृष्णा देशपांडे, एकनाथ माने देशमुख, सागर जगताप, दत्तात्रय येडगे, अरुण लोखंडे, वाहिद मुलाणी, रियाज तांबोळी, आदि. उपस्थित होते.



## खंडाळीचे सरपंच पताळे यांना समाजरत्न पुरस्कार प्रदान

**सुराज्य/वेळापूर** : खंडाळी ग्रामपंचायत ता. माळशिरस येथे जनकल्याण मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्था. महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने संस्थापक अध्यक्ष संतोष खंडागळे यांच्या हस्ते सरपंच बाबुराव पताळे यांना समाजरत्न पुरस्कारांनी सन्मानित करून आदर्श सरपंच म्हणून गौरव करण्यात आले. यावेळी माजी पंचायत समिती सदस्य राजाराम खंडागळे, ग्रामपंचायत सदस्य गणपत खंडागळे, रामचंद्र खंडागळे, तानाजी पाटील, दिपक लोहकरे, ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

## पक्षी सप्ताह वन विभागातर्फे विविध उपक्रमांनी साजरा

**सुराज्य/सोलापूर** : पक्षी सप्ताह वन विभागाच्या वतीने विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला. वन विभाग व वाईल्ड लाईफ कॉन्झर्वेशन असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने, वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी तालुका स्तरावर विविध कार्यक्रम आयोजित केले होते.

पक्षी सप्ताह सांगता कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अरण्यऋषि पक्षी अभ्यासक मारूती चित्तमपल्ली होते तर प्रमुख पाहुणे आ. सुभाष देशमुख, मुख्य वनसंरक्षक एन. आर. प्रवीण यांची उपस्थिती होती. चित्तमपल्ली यांच्याहस्ते सिध्देश्वर वनविहारमधील वन्यजीव संक्रमण केंद्राचे, निसर्ग पाऊल वाट (निरीक्षण पथ)चे उद्घाटन यावेळी करण्यात आले. घेण्यात आलेल्या चित्रकला, निबंध स्पर्धांचे मान्यवरांच्या हस्ते बक्षीसवितरण करण्यात आले. राष्ट्रीय शहीद दिनानिमित्त ५ हजार रोपांची लागवड यावेळी करण्यात आला. स्पर्धेत सहभागी शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, सेवाभावी संस्था, अशासकीय संस्थांना प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. सोलापूर वन विभागातील वनपरिक्षेत्र अधिकारी, त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय कर्मचारी उपस्थित होते.

## अधिकाऱ्यांना दमदाटी व शिवीगाळ

**सुराज्य/अकलूज** : विझोरी (ता. माळशिरस) येथील रस्त्यावरचे अतिक्रमण काढण्यासाठी गेलेल्या महसूल कर्मचारी व पोलिसांना दमदाटी व शिविगाळ केल्या प्रकरणी विझोरी येथील १० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली आहे.

याबाबत अकलूज पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार दिनांक १४ रोजी ११. ३० वाजण्याच्या सुमारास विझोरी ता. माळशिरस येथील शेती गट नं. ३४० / ब / २ या शेताकडे जाण्याचे रस्त्यावर दिवाणी न्यायालय क स्तर, माळशिरस यांचेकडील आदेशाने अर्जदार द्रौपदि तानाजी इंगळे मुखत्यार तानाजी शंकर इंगळे रा. विझोरी ता. माळशिरस यांचे विझोरी ता. माळशिरस येथील शेती गट नं. ३४० / ब / २ या शेताकडे जाण्याचा रस्ता खुला करणेकरीता व शेताची मशागत करणेकरीता पोलिस अधिक्षक सोलापुर ग्रामीण यांचेकडील आदेश जा. क्र. - जिविशा / पोलिस संरक्षण / २०२२ / ६%३४ सोलापुर ग्रामीण प्रमाणे पोलिस निरीक्षक यांचे आदेशाप्रमाणे पोहेकॉ संदेश सुखदेव शिकतोडे व त्यांच्यासोबत असलेले पोलिस अधिकारी व कर्मचारी तसेच तहसील कार्यालयाकडील मंडल अधिकारी चंद्रकांत भोसले व तलाठी श्री घाडगे वरील आदेशाप्रमाणे रस्त्यावर केलेले अतिक्रमण काढणेकरीता बंदोबस्तास हजर असताना १) धर्मेश रंगनाथ काळे २) शिवाजी रामा भगवे ३) भानुदास सोनबा भगवे ४) बाळाबाई शिवाजी भगवे ५) निर्मला भिमा भगवे ६) सुरवंता शंकर भगवे व त्यांचे नातेवाईक %) कलावती गणेश पवार ८) ललिता राजेंद्र काळे ९) मंदाबाई धर्मेश काळे १०) सुगंधा दत्तात्रय काळे सर्व रा. भगवे वस्ती, विझोरी ता. माळशिरस यांनी आम्ही सदरचे अतिक्रमण काढु देणार नाहि, असे म्हणुन पोलिस स्टाफ व तहसील कार्यालयाकडील मंडल अधिकारी व तलाठी व अर्जदार यांना शिवीगाळी, दमदाटी करुन अंगावर धावुन आले तसेच त्यांनी हातामध्ये प्लॅस्टिक पिशवीमध्ये व प्लॅस्टिक डब्यामध्ये पेट्रोल आणुन पोलिस स्टाफ व तहसील कार्यालयातील मंडल अधिकारी व तलाठी यांना तुम्ही अतिक्रमण काढले तर आम्ही अंगावर पेट्रोल ओतुन जळुन मरु अशी धमकी दिली.

## नरहर कुरुंदकर यांच्या जीवनाचे दर्शन घडवणारे अभिनव नाटक शुक्रवारी सोलापुरात

**सुराज्य/सोलापूर**

महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा दक्षिण सोलापूर आणि हरिभाई देवकरण प्रशाला याच्या संयुक्त विद्यमाने नरहर कुरुंदकर एका विचारवंताची अपरिचित गोष्ट या साभिनय अभिवाचनाच्या नाट्यप्रयोगाचे शुक्रवार दि. १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६. २५ वाजता हुतात्मा स्मृती मंदिर मध्ये आयोजन करण्यात आल्याची माहिती परिषदेच्या अध्यक्षा रेणुका महागांवकर आणि कार्याध्यक्ष प्रशांत बडवे आणि ह. दे. प्रशाला शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी दिली.

सुप्रसिध्द विचारवंत नरहर कुरूंदकर यांचा जीवन प्रवास व विचार आजच्या परिस्थितीही किती उपयुक्त आहेत हे प्रभावीपणे मांडणारे नरहर कुरुंदकर - एका विचारवंताची अपरिचित गोष्ट हे अनोखे रंगमंचीय सादरीकरण आहे. या नाट्यप्रयोगाची संकल्पना आणि लेखन तसेच दिग्दर्शन अजय अंबेकर यांचे असून यामध्ये दूरदर्शनच्या वृत्त निवेदिका ज्योती अंबेकर यांचा सहभाग आहे तसेच मुंबई, नांदेड येथील प्रतिथयश कलावंत हा दोन अंकी नाट्यप्रयोग सादर करणार आहेत यामध्ये ज्येष्ठ अभिनेते दिलीप पाध्ये, ज्योती पाध्ये, राजीव किवळेकर, बालकलाकार शुभंकर देशपांडे, यांचा सहभाग आहे. नरहर कुरूंदकर यांचे व्यक्तिमत्व बहुआयामी होते. इतिहास, राजकारण, नाट्यशास्त्र, स्वातंत्र्वय लढा, संगीत साहित्य समिक्षा अशा विविध विषयावरील मूलगामी मते सडेतोडपणे मांडून त्यांनी अवघे विचारविश्व हादरवून सोडले होते. पुरोगामी विचाराच्या मांडणीबरोबरच अनेक साहित्यिक, सांस्कृतिक संस्था उभारणीला त्यांनी मोठे पाठबळ दिले. मराठवाड्यात त्यांनी विद्यार्थी घडवणे, व्यक्ती आणि संस्था यांना प्रोत्साहन देण्याची मोठी कामगिरी केली आहे. या सर्व पैलूंची अत्यंत रंजकपणे मांडणी या प्रयोगात करण्यात आली आहे.

**CHANGE IN NAME**

I Here By Declare That My Old Name Amit Damodhar Devsani (old name), Has Been Changed to

**Amit Damodar Devsani**
**(New Name)**

Residing AT 1196-A, New Paccha Peth, Solapur 413006 Kindly Note The Same

Noted & Registered At Serial No. 9669 Dt - 15/11/2022

**निवडणूक निर्णय अधिकारी,**
**सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था मर्या., बाळे, सोलापूर**
**तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, उत्तर सोलापूर**
४५/२, श्रीखंडे बंगला, नवल पेट्रोल पंपाजवळ, रेल्वे लाईन, सोलापूर

**जाहीर प्रकटन**

सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था मर्या., बाळे, सोलापूर या सहकारी पतसंस्थेचे संचालक मंडळ निवडणूक सन २०२२-२३ ते सन २०२७-२८ साठी दिनांक २०/११/२०२२ रोजी सकाळी ८.०० ते सायं. ५.०० या वेळेत घेण्यात येणाऱ्या मतदानाची मतदान केंद्रे खालीलप्रमाणे राहतील.

| मतदान केंद्र क्र. | मतदान केंद्राचे ठिकाणाचे नाव | तालुका | मतदान केंद्रास जोडलेली संबंधित तालुक्यातील मतदार संख्या |
|---|---|---|---|
| १ | विद्याविकास प्रशाला, लक्ष्मी टाकळी, पंढरपूर | पंढरपूर | १८६ |
| २ | संजयमामा शिंदे विद्यालय, कुर्डूवाडी | माढा | २१२ |
| ३ | महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला, यशवंत नगर, अकलूज | माळशिरस | २८३ |
| ४ | सुलाखे हायस्कूल, बार्शी | बार्शी | ३६८ |
| ५ | न्यु इंग्लिश स्कूल, सांगोला | सांगोला | ३८७ |
| ६ | ज.रा. चंडक प्रशाला, बाळे | उत्तर सोलापूर | १६७ |
| ७ | काशिराया पाटील विद्यालय, अक्कलकोट | अक्कलकोट | २६१ |
| ८ | महात्मा गांधी विद्यालय, करमाळा | करमाळा | १७९ |
| ९ | स्वामी विवेकानंद प्रशाला, जुळे सोलापूर | दक्षिण सोलापूर | १४२ |
| १० | नेताजी प्रशाला, मोहोळ | मोहोळ | २५० |
| ११ | जवाहरलाल शेतकी प्रशाला, मंगळवेढा | मंगळवेढा | १९० |

दिनांक २०/११/२०२२ रोजी घेण्यात आलेल्या मतदानाची मतमोजणी दिनांक २१/११/२०२२ रोजी सकाळी ८.०० वाजलेपासून मधुरा मल्टीपर्पज हॉल, खेड, (बाळे), बार्शी रोड, टोल नाक्याजवळ, सोलापूर याठिकाणी घेण्यात येईल.

दिनांक : १२/११/२०२२
स्थळ : सोलापूर

सही/- **(ए.ए. गावडे)**
निवडणूक निर्णय अधिकारी,
सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था मर्या., बाळे, सोलापूर
तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, उत्तर सोलापूर

**जाहिर नोटीस**

क्रमांक : एकत्री/अपील/एस.आर.२५५३/२०२१
जावक क्र. ३४३६

**सोलापूर येथील मा. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांचे कोर्टात**

प्रति,
१) बिभीषण दत्तात्रय रणनवरे, रा. मांडकी, ता. माळशिरस, जि. सोलापूर —— **अपीलदार**
विरुध्द
**१)** एकत्रिकरण अधिकारी, सोलापूर **२)** महादेव शंकर रणनवरे, रा. मांडकी, ता. माळशिरस, जि. सोलापूर **३)** बापुराव शिवाजी पाटील, रा. कण्हेर, ता. माळशिरस, जि. सोलापूर **४)** दादा मारूती निंबाळकर **५)** गुलाब मारूती निंबाळकर **६)** मालन पुंडलिक रणनवरे **७)** बबई रामु रणनवरे **८)** सिताराम गंगाराम रणनवरे **९)** विश्वंभर नारायण रणनवरे **१०)** वसंत नारायण रणनवरे **११)** अशोक नारायण रणनवरे **१२)** जिजाबा नारायण रणनवरे **१३)** नागनाथ शिवाजी रणनवरे **१४)** श्रीरंग यशवंत रणनवरे **१५)** राणी तुकाराम रणनवरे वरील अ. क्र. ४ ते १५ रा. मांडकी, ता. माळशिरस, जि. सोलापूर **१६)** कृष्णा बलभिम पवार **१७)** स्वाती लक्ष्मण पवार दोघे रा. इस्लामपूर, ता. माळशिरस जि. सोलापूर —— **जाबदार**

**विषय - मौजे मांडकी, ता. माळशिरस येथील चालू गट नं. २७५ च्या ७/१२ उताऱ्यावर वारसांची नावे दाखल होणेबाबत**

ज्याअर्थी अपीलदार यांनी सोलापूर येथील मा. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सोलापूर यांचे न्यायालयात क्र. एकत्री/अपील/एसआर २५५३/२०२१ अन्वये मौजे मांडकी, ता. माळशिरस येथील चालू गट नं. २७५ च्या ७/१२ उताऱ्यावर वारसांची नावे दाखल होणेबाबत अपील दाखल केलेले असून सदर अपीलाकामी **जाबदार क्र. ७) बबई रामु रणनवरे, रा. मांडकी, ता. माळशिरस, जि. सोलापूर** यांना अपील सुनावणीकामी इकडील कार्यालयाकडून नोटीस काढली असता, संबंधित जाबदार हे दिलेल्या पत्त्यावर राहत नसलेने नोटीस पाठवूनही न बजावता परत आली आहे. त्याअर्थी वर नमुद जाबदार क्र. ७ व त्यांचे कायदेशीर वारसदार यांना या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून ०८ दिवसांचे आत किंवा नेमलेली तारीख २३/११/२०२२ रोजी मा. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सोलापूर यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर येथे सकाळी ११.०० वाजता स्वतः अगर वकिलामार्फत हजर राहून वर नमुद अपीलाकामी हजर राहून जरूर ते म्हणणे द्यावे. येणेप्रमाणे वागण्यास कसूर केल्यास सदर अपीलाचे कामी जाबदार क्र. ७ व त्यांचे कायदेशीर वारसदार यांचे विरूध्द एकतर्फी अपीलाचे कामकाज चालवून निकाल होईल. सबब, सदरची जाहीर नोटीस दिली.

(शिक्का)

सही/- **(हेमंत सानप)**
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सोलापूर

**जाहीर समन्स**

**मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा)**
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप असोसिएशन लि. सोलापूर
११३(अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर

**दि. पंढरपूर अर्बन को-ऑप, बँक लि., पंढरपूर**
**४१६३ ब, प्रशासकीय भवन, नवी पेठ, पंढरपूर** **- अर्जदार**
विरुध्द
(खालील तपशीलामध्ये नमुद केलेले थकबाकीदार / सभासद) **- जाब देणार**

| अ. नं. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार | जाब देणारेचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १. | ३७२/ २०२१-२०२२ | ७,०९०/- | ३ | **दिपाली प्रदीप कांचनकोटी** रा. माळी गल्ली, गजानन महाराज मठामागे, पंढरपूर, जि. सोलापूर |
| २. | ४५८/ २०२१-२०२२ | ५,३७,०४८/- | १ | **प्रशांत शिवाजी पवार,** रा.अ./२६, मंत्री चंडक पार्क, विजापूर रोड, सोलापूर |
| | | | २ | **दिपक शिवाजी पवार** रा. अ-३/२६, मंत्री चंडक पार्क, विजापूर रोड. सोलापूर |
| | | | ३ | **बाबूलाल लालासाहेब मुल्ला** रा. नेहरु नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| | | | ४ | **दिलीप राम राठोड** रा.५९९, नेहरु नगर, शासकीय मैदान, सोलापूर |
| ३. | १२२७/ २०२१-२०२२ | ३,६७,४१९/- | २ | **सज्जन पांडुरंग पावणे** रा. देगांव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर |
| | | | ३ | **भगवान हरिभाऊ घाडगे** रा. देगांव, ता. पंढरपूर |
| ४. | ३५८/ २०२१-२०२२ | ५१,७६७/- | १ | **महादेव सिध्दण्णा पुजारी** रा. डोणज, ता. मंगळवेढा |
| | | | २ | **राजश्री महादेव पुजारी** रा. डोणज, ता. मंगळवेढा |
| | | | | **बिल्याणी भिमशा पुजारी** रा. डोणज, ता. मंगळवेढा |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.


**उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार शुक्रवार, दि. ०९/१२/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रांसह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १५/११/२०२२ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

(शिक्का)

सही/- **उपनिबंधक**
सहकारी संस्था, (परसेवा)
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप, असोसिएशन लि., सोलापूर



## लहुजी साळवे यांची जयंती वेळापुरात साजरी

**सुराज्य/वेळापूर** : वेळापूर येथील बस स्थानक लगत असलेल्या लोकशाहीर आण्णाभाऊ साठे अर्धाकृती पुतळा येथे स्वातंत्र्याचे जनक आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांची २२८ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या प्रतिमेचे पूजन वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव तर साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याचे पुजन डॉ. शिवाजी पनासे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर लहुजी चौक या ठिकाणी देखील आद्य क्रांतिगुरु लहुजी वस्ताद साळवे व साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित सर्व मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. आद्य क्रांतिगुरु लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीचे औचित्य साधून छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. दरम्यान माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब धाईंजे, रिपाई माळशिरस तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे, बहुजन मुक्ती पार्टीचे राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य काकासाहेब जाधव, अशोक बनसोडे, रायचंद खाडे, राष्ट्रवादीचे सामाजिक न्याय विभागाचे तालुकाध्यक्ष रजनीश बनसोडे, युवा नेते संजय पनासे, ग्रामपंचायत सदस्य गणेश चव्हाण, महेंद्र साठे, भाऊ थोरात, शिवम पनासे, सुनील साठे, प्रदीप सरवदे महेश साठे, पप्पू साठे, बाळासाहेब चव्हाण, महादेव नाईकनवरे, हनुमंत साठे, प्रवीण साठे, सोमनाथ साठे, दिलीप वाघमारे, नागेश साठे, राहुल नाईकनवरे, अतुल साठे, ओंकार साठे, सह मातंग समाज बांधव ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. शिवाजी पनासे व मित्र परिवार यांच्यावतीने करण्यात आले होते.

## अनंत चैतन्य प्रशालेत बालदिवस साजरा

**सुराज्य/अक्कलकोट** : भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा १३३वा जन्मदिवस महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचालित अनंत चैतन्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला, हन्नूर येथे बालदिवस म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी सर्वप्रथम प्रशालेचे पर्यवेक्षक अशोक साखरे यांच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरू जींच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन करण्यात आले. यानंतर प्रशालेच्या विद्यार्थिनी करिश्मा जमादार, राणी तेली, अदिती व्हनमाने, अंजली रोट्टे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. व प्रशालेचे जेष्ठ शिक्षक शहाजी माने, शिक्षिका स्वप्नाली जमदाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पंडित जवाहरलाल नेहरू ना मुले खुप आवडत. मुले ही त्याना चाचा नेहरूम्हणत असत. म्हणूनच त्यांचा जन्मदिवस बालदिवस म्हणून साजरा केला जातो. अशा या बालदिनाचे औचित्य साधून गणेशोत्सवकाळात प्रशालेच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेत (जसे रंगभरण, इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा लहान व मोठा गट) प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त केलेल्या व प्रश्नमंजुषेतील विजेता (लहान व मोठा) गटातील सर्व मुलां-मुलींना शालेय साहित्य देऊन प्रशालेचे सन्माननिय मुख्याध्यापक श्रीयुत विलास बिराजदार सर यांच्या हस्ते गौरवण्यात आले तसेच इयत्ता नववीतील विद्यार्थिनी अदिती भिमराव व्हनमाने हिचा वाढदिवस असल्याने वर्ग शिक्षक व छायाचित्र विभाग प्रमुख धनंजय जोजन यांच्या हस्ते शालेय साहित्य व गुलाबपुष्प देऊन शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन प्रशालेच्या उपक्रमशिल शिक्षिका. मल्लमा चप्पळगाव यांनी तर आभार सांस्कृतिक कार्यक्रम विभाग प्रमुख अप्पासाहेब काळे यांनी मानले. वंदे मातरम्ने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी ज्येष्ठ शिक्षक सरदार मत्तेखाने, ज्ञानदेव शिंदे, विश्वनाथ चव्हाण, सुरेश जाधव, जेष्ठ शिक्षिका मृदलादेवी स्वामी व समस्त शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग, विद्यार्थी -विद्यार्थिनी उपस्थित होते.

## जि.प. कर्मचारी महासंघ, मोहोळच्या तालुकाध्यक्षपदी माने

**सुराज्य/उत्तर सोलापूर** : महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्या मोहोळ तालुकाध्यक्षपदी भगवान माने, कनिष्ठ सहाय्यक, सरचिटणीस - रविंद्र शेंडगे कनिष्ठ सहाय्यक यांची एकमताने निवड करण्यात आली. पंचायत समिती मोहोळ येथे झालेल्या जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाची सभा मोहोळ पंचायत समिती मध्ये संघाचे जिल्हाध्यक्ष राजेश देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी सुरेश राठोड, सचिव दिनेश बनसोडे, प्रमोद धावड यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली. इतर पदाधिकारी पुढील प्रमाणे- कार्याध्यक्ष - विस्तार अधिकारी श्रीमती एस सी दाढे, उपाध्यक्ष - ग्रामविकास अधिकारी सोनवणे, महिला उपाध्यक्ष - अनिता पुळूजकर व प्रतिभा मारडकर, निलेश पोटरे - सह सचिव, संघटक- सचिन फुडे, भारत चौधरी, यांची, रोखापाल व अंतर्गत लेखा परीक्षक - रवि लिगाडे, व सल्लागार - अरुण वाघमोडे, विकास माने, तात्या नाईकनवरे, अनंत माने, विठ्ठल वाघमारे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी कनिष्ठ प्रशासन अधिकारी आनंद शेषगिरी, लेखाधिकारी अनंत माने, नागेश भालेराव, विस्तार अधिकारी संघटनेचे संदीप खरबस, गावडे, शेती अधिकारी कल्याण कांबळे, आरोग्य कर्मचारी युनियन चे विष्णू सानेपागुल, नंदकुमार निकंबे उपस्थित होते. सूत्र संचालन राजेश देशपांडे, आभार दिनेश बनसोडे यांनी मानले.

## न्यू हायस्कूल सलगरवाडीमध्ये बालदिन साजरा

**सुराज्य/उत्तर सोलापूर** : सलगरवाडी येथील न्यू हायस्कूल येथे माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंती निमित्ताने व बाळंदीनानिमित्त प्रतिमेचे पूजन अत्तार सर यांच्या हस्ते, मुख्याध्यापक कार्तिक चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी तांबुळकर, दाते सर, पर्यवेक्षक बिराजदार सर यांनी मनोगते व्यक्त केले. सूत्रसंचलन कोरे, आभार बिराजदार यांनी माणले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जाधव सर प्रशालेतील शिक्षकांनी प्रयत्न केले.

# ‘त्या’ द्राक्ष बागांची शास्त्रज्ञांनी केली पाहणी

### तणनाशकामुळे लाखोंचे नुकसान

**सुराज्य/सोलापूर**

पंढरपूर तालुक्यातील करकंब व बार्डी येथील अनेक शेतकऱ्यांच्या द्राक्षे बागा या गेल्या एक ते दीड महिन्यापासून फुटल्या नसल्यामुळे अशा शेतकऱ्यांनी तालुका कृषी कार्यालयात आपल्या लेखी तक्रारी केल्या होत्या. त्यामुळे कृषी विभागाच्या माध्यमातून शास्त्रज्ञानी आता अशा बागांची प्रत्यक्षात पाहणी करण्यात आली आहे.

येथील एकूण २० शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या असून त्यानुसार एकूण ७ ते ८ हेक्टर क्षेत्रावरील बागा या फुटल्या नसल्याचे समोर आले आहे. राहुरी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ पाटील यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बागेत प्रत्यक्षात जाऊन शेतकऱ्यांकडून न फुटलेल्या बागेत फवारणी केलेल्या विविध औषधांची माहिती घेऊन बागेचे एकूण क्षेत्र, एका झाडाला किती काडी आहेत, झाडांमधील अंतर तसेच बागेत तणावर फवारणी साठी वापरण्यात आलेले तणनाशक, काडीला वापरण्यात आलेली पेस्ट याची सविस्तर माहिती घेण्यात आली असून संबंधित तणनाशकांच्या प्रयोगशाळेतील नमुन्याचा अहवाल आल्यानंतर यावर निष्कर्ष काढता येईल असे सांगितले.



### शेतकऱ्यांचे न भरून येणारे नुकसान

एक एकर द्राक्ष बाग उभारण्यासाठी ४-५ लाख रूपये खर्च येतो त्यामुळे नुकसान झालेल्या एकूण ७ ते ८ हेक्टर म्हणजे तब्बल २५ एकर क्षेत्रावरील बागेची पिकाची छाटणी केल्यापासून एक ते दीड महिना झाला तरी बागा फुटल्या नसल्यामुळे एक वर्षातील पिकाचे एकरी ५ लाख रुपयांचे न भरून येणारे नुकसान झाले असून याबाबत शासन स्तरावरून तात्काळ मदत मिळावीअशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

यावेळी जिल्हा कृषी अधिक्षक बाळासाहेब शिंदे, पंढरपूर तालुका. प्रभारी कृषी अधिकारी भागवत सरडे, मंडल कृषी अधिकारी महेश देवकते, सहाय्यक मंडल कृषी अधिकारी झोळ, कृषी साहाय्यक लिंगे व शेतकरी उपस्थित होते.

## पंढरपूरचे पुरवठा निरीक्षक नाईकांवर निलंबनाची कारवाई व्हावी

### रेशन दुकानदार संघानेची पुरवठा विभागाच्या उपायुक्तांकडे मागणी

**सुराज्य/सोलापूर**

पंढरपुर पुरवठा विभागातील पुरवठा निरीक्षक सदानंद नाईक यांचा मनमानी कारभार उघड झाल्यानंतर आता रेशन दुकानदारांना आर्थिक, मानसिक व शाररिक त्रास दिला जात आहे. दुकानदारांकडून लाखोची रक्कम वसुली करुन अफाट माया जमा केलेल्या पुरवठा निरीक्षक नाईक यांची पुणे विभागाच्या विशेष पथकामार्फत कार्यालयीन चौकशी करत त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी रेशन दुकानदार संघटनेच्या वतीने पुणे पुरवठा विभागाचे उपायुक्त डॉ. त्रिगुण कुलकर्णी यांच्याकडे केली आहे.

सोलापूर जिल्हा रास्त भाव धान्य दुकानदार संघटना ही दुकानदाराच्या अडचणी शासनासमोर मांडून त्याचा निपटारा करण्याचे काम नेहमी करीत असते. आपल्या योजलेल्या महत्वकांक्षी योजनांचे पालन करुन त्यास पूर्णत: रावबविण्याचे काम सोलापूर जिल्हा संघटनेनी क्षणोक्षणी केलेला आहे. असे असताना काही पंढरपुर तहसिल कार्यालय अंतर्गत येणाऱ्या पुरवठा शाखेतील कॉम्पुटर ऑपरेटर सिध्दु देठे, बापु कांबळे व सुरज कांबळे हे राजरोसपणे रेशन दुकानदारांकडुन युनिटवाढ करण्यासाठी फिडींग करण्यासाठी, ट्रकशिट सोडविण्यासाठी तसेच पंढरपुर हे तीर्थक्षेत्र असल्याने येथे येणारे प्रत्येकाचे प्रोटोकॉल शासकिय सभा, व्ही. आय. पी. दौरेच्या नावाखाली रक्कमेची मागणी करुन रक्कम सक्तीने वसुली केली जात असल्याचे तक्रार सोलापूर जिल्हा संघटनेकडून केली होती.

सदर तक्रारीची दखल आपल्या आदेशाने कॉम्पुटर ऑपरेटर यांना पुरवठा विभाग येथुन हटवण्याचे आदेश दिले होते. मात्र आपल्या आणि तहसिलदार यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत पुरवठा निरिक्षकांनी आपला उद्योग पुन्हा सुरू केला आहे. पुन्हा त्या झीरो कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून आपला गोरखधंदा चालू केला आहे. ज्या दुकानदारांनी

> गेली अनेक दिवसापासून पंढरपुर पुरवठा विभागातील निरिक्षक नाईक पंढरपुरातील रेशन दुकानदारांना नाहक त्रास देत आहे. परिणामी सर्व दुकानदार भयभित झाले आहे. त्यामुळे नाईक यांच्या विरोधात उपायुक्त डॉ. कुलकर्णी यांच्याकडे रितसर तक्रार केली आहे. तक्रारीची दखल नाही घेतल्यास नाईक हटाओ साठी उग्र आंदोलन हाती घेतले जाईल
>
> **– सुनील पेंटर**
>
> (जिल्हाध्यक्ष रेशनदुकानदार संघटना)

तक्रारी केल्या आहेत त्यांना टार्गेट केले जात आहे. त्यांना त्रास दिला जात आहे. पूर्वीप्रमाणे सक्तीची वसुली करण्याचा धंदा पुन्हा जोमात चालू आहे. ज्या दुकानदारांनी फोन पे चा स्क्रिन शॉट सोलापूर जिल्हा संघटनेला दिले होते त्यांना पुरवठा निरीक्षक हे त्या दुकानदारांना मानसिक त्रास देवून त्यांना 'तुमचे गणेश कदम करेन, तुम्हास बघुन घेईन मी पुरवठा विभागातील आहे आज ना उद्या मी येथेच नायब तहसिदार पदी येवून तुम्हास बघुन घेईन' अशी दमदाटीची भाषा वापरुन दुकानदारांना मानसिक त्रास देत आहेत. त्यामुळे ज्यांनी स्क्रिन शॉट दिले होते ते दुकानदार भयभीत झाले आहे.

शंभर टक्के आधार सिडींग करुन घेण्याचे काम हाती घेतले असताना त्याचा गैरफायदा घेवून त्या दुकानदारांचे अंत्योदय व अन्नसुरक्षा मधील कार्डधारकांचे पूर्ण आर. सी. कॉम्पुटर ऑपरेटरांमार्फत डिलीट करुन त्यांच्या त्या दुकानाचे बनावट तक्रारी निर्माण करुन दुकानाची तपासणी करुन त्यांचे दुकान निलंबित करण्याची धमकी देत आहेत. अशी तक्रार करत या पंढरपुर पुरवठा विभागातील निरिक्षक नाईक यांची आपल्या कर्यालयाकडून चौकशी करून कारवाई करावी असे मागणी रेशन दुकानदार संघटनेनी केली आहे.



## नवीन व्यायामशाळा व इनडोअर बॅडमिंटन हॉलचे नूतनीकरण

**सुराज्य/अक्कलकोट**

तालुक्यातील युवकांचे व नागरिकांचे आरोग्य सशक्त व सदृढ रहावे यासाठी व्यायाम आणि खेळ या दोन्हीचा लाभ एकाच छताखाली घेता यावा याकरिता नवीन व्यायाम शाळा व इनडोअर बॅडमिंटन हॉलचे नूतनीकरण करण्यात आल्याचे मनोगत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

ते सोमवारी प्रसिध्द फत्तेसिंह क्रिडांगणावरील भारत सरकार क्रिडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे आणि तालुका क्रिडा संकुल अक्कलकोट यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन आ. कल्याणशेट्टी हे बोलत होते. दरम्यान बाल दिनानिमित्त कु. अश्विनी राठोड, शिल्पा पवार या विद्यार्थिनीच्या हस्ते व्यायाम शाळा व इनडोअर बॅडमिंटन हॉलचे नूतनीकरणाचा शुभारंभ करण्यात आले.

यावेळी तहसिलदार तथा कार्याध्यक्ष बाळासाहेब सिरसट, जिल्हा क्रीडा अधिकारी नितीन तारळकर, मुख्याधिकारी सचिन पाटील, गटविकास अधिकारी सचिन खुडे, तालुका क्रीडा संकुल समिती सदस्य उपनगराध्यक्ष यशवंत धोंगडे, मल्लिकार्जुन आळगी, अमोल कोकाटे, तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव, आरपीआय तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे, ॲड. विजय हार्डीकर, विक्रम शिंदे, नन्नू कोरबू, सिध्दाराम जाधव, अमर शिरसाट, अविनाश राठोड आदी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आर्किटेटर कोंडा, क्रिडाशिक्षक प्रकाश सोनटक्के, प्रा. बिराजदार, कु. नंदिनी नंदे कु. अंकिता उदगीरे, रवींद्र भंडारे, डॉ. सौरभ अळळे, आप्पासाहेब पाटील, लक्ष्मीकांत तळवार, विष्णू शिंपाळे, रेणुक मंगळुरे, महादेव झळके आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रस्तावना व आभार चंद्रकांत दसले यांनी मानले.

## लक्ष्मीनगर शाळेत बालदिन साजरा

**सुराज्य/पिलीव** : माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जि प लक्ष्मीनगर शाळेत भारताचे पहीले पंतप्रधान स्व पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त संपूर्ण भारतात साजरा होणारा बालदिन लक्ष्मीनगर येथील जि प शाळा व अंगणवाडी यांच्यावतीने मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला.

यावेळी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. मुख्याध्यापक सुहास कोल्हे यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. यावेळी लिंबु चमचा, संगीत खुर्ची यासह विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामुळे सहशिक्षक सुनील डुरे, अंगणवाडी सेविका सत्यभामा मदने, विद्यार्थी उपस्थित होते. विदयार्थ्यांना खाऊ वाटप करुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## कुसमोड येथे लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा

**सुराज्य/पिलीव**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथे ग्रामस्थ व श्रीराम भक्तांनी दिवाळीचे औचित्य साधून हनुमान मंदीरात श्रीराम विजय ग्रथांचे पारायण सुरू केले होते.

सदरचा कार्यक्रम हनुमान मंदीरात आयोजित करण्यात आला होता. लक्ष्मण शक्ती मुक्तीच्या वाचनाचा कार्यक्रम अतिशय भक्तीमय वातावरणात असंख्य वाचक व भाविकांच्या उपस्थित सुरु करुन रात्रभर वाचनाचा कार्यक्रम करुन लक्ष्मण शक्ती मुक्तीच्या प्रसंगी फटाके व तोफांच्या आतिषबाजीत श्रीमंत जय राम जय जय राम या जयघोषात व टामृदंगाच्या गजरात आरतीचा कार्यक्रम होऊन प्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे पौरोहित्य केसरकर महाराज यांनी केले. यावेळी हभ पा केशव मदने, बलभीम धायगुडे, महादेव धायगुडे, कैलास धायगुडे, दादा झंजे, केशव शिंदे, अजिनाथ नरळे, छाया धायगुडे, गुरव मॅडम, पोपट गुरव, निवृत्ती सातपुते, साधु भिसे, धुळा करे, केसकर काका, लोहकरे, यांनी विशेष परीश्रम घेतले. यावेळी आनता कपने, कैलास धायगुडे, छाया धायगुडे यांनी दिली. या लक्ष्मण शक्ती मुक्ती कार्यक्रमास सहकार्य करणाऱ्या भाविक भक्तांचा, ग्रामस्थांनचा कुसमोडचे सरपंच तुषार लवटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य महावीर धायगुडे व मान्यवर उपस्थितीत होते.

# लोकवर्गणीतून स्थानिक स्तरावर मानधनावर शिक्षक नेमून नुकसान टाळा : आ. शिंदे

### लोकवर्गणीतून झालेला शाळांचा विकास हा सर्वांना आनंददायी

**सुराज्य/माढा**

पवित्र पोर्टल द्वारे शिक्षक भरती होणार असून रिक्त पदांची संख्या खुप आहे. मात्र गावकर्यांनी लोकवर्गणीतून डीएड बीएड झालेले सुशिक्षीत बेरोजगारांना मानधन तत्वावर काम देत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यास पुढाकार घ्यावा असे आवाहन आमदार बबनराव शिंदे यांनी केले.

माढ्यातील जिल्हा परिषद प्राथमिक मुलांची शाळा नंबर एक या ठिकाणी संगणक कक्षाचे उद्घाटन व कृतज्ञता सोहळ्याच्या समारंभात ते बोलत होते.

लोकवर्गणीतून शालेय विकास झाल्यानंतर शाळांमध्ये आमुलाग्र बदल होऊन संस्कारक्षम व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळते. आणि ही गोष्टी सर्वांना आनंददायी ठरते. या गोष्टीचा आदर्श माढ्यातील शाळा नं १ च्या व्यवस्थापन समिती गावकरी व शिक्षकांच्या टीमने जिल्ह्याला घालून दिल्याचे गौरवोद्गार आमदार बबनराव शिंदे यांनी काढले.

पुढे बोलताना आमदार बबनराव शिंदे म्हणाले, सद्यस्थितीत व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून लोकवर्गणीतून आणि शिक्षकांच्या कष्टाने केलेल्या प्रयत्नाने मराठी शाळा भौतिक सुविधायुक्त आणि गुणवत्तापूर्ण बनलेल्या आहेत. यामुळे इग्रजी शाळांच्या तुलनेत जिल्हा परिषदेच्या शाळांची पटसंख्या वाढली आहे. या शाळेच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धैर्यशील भांगे यांनी सोळा लाखांचा लोकवाटा जमा करून नवा आदर्श निर्माण केला आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात शाळेचे माजी अध्यक्ष धैर्यशील भांगे यांनी गेल्या दहा वर्षात सोळा लाखांची लोकवर्गणी जमा करून केलेल्या विधिध कामांची व शाळेच्या गुणवत्तेची माहीती दिली. आमदार बबनराव शिंदे यांच्या आमदार फंडातून सात लाख रूपयांचे संगणक दिल्याबद्दल आमदार बबनराव शिंदे व सर्व देणगीदात्यांचे आभार व्यक्त केले.

यावेळी बोलताना दादासाहेब साठे म्हणाले, ब्रिटीशकालीन मराठी शाळेची अवस्था मूलभूत सुविधांअभावी अतिशय खराब झाली होती. अशा परिस्थितीत शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून धैर्यशील भांगे यांनी ज्या लोकसहभागातून सुविधा निर्माण केल्या याचा फायदा विद्यार्थ्यांना होणार आहे.



### यांचा झाला सन्मान

विकास वाघमारे, पृथ्वीराज सावंत, भारत पालकर, डॉ अशोक मेहता, सचिन चवरे, सोमनाथ चवरे, चारूदत्त आष्टेकर, दिनेश साळुंखे, सोमनाथ शिंदे, अय्युबखान शेख, प्रवीण नागटिळक, अनिल हणमे, शशिकांत घोलप, मुख्याध्यापक आण्णासाहेब क्षीरसागर, प्रदीपकुमार चवरे.

### विशेष सन्मान

गेल्या दहा वर्षापासून शाळेसाठी सोळा लाखांची लोकवर्गणी करून शाळेच्या सर्व समस्या सोडविल्याबद्दल धैर्यशील भांगे यांचा आमदार बबनराव शिंदे यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

यानंतर या शाळेची नवीन इमारत करताना जुन्या इमारतीचे पाडकाम न करता जुना ठेवा असाच ठेऊन नवीन इमारतीचे नियोजन करण्याचीमागणी केली.


यावेळी शिष्यवृती परिक्षेतीलगुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिके देऊन गुणगौरव करण्यात आला.

या समारंभाला नगराध्यक्षा मिनल साठे, उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, झुंजार भांगे, दादासाहेब साठे, अशोक लुणावत, पृथ्वीराज सावंत, डॉ अशोक मेहता, केंद्र प्रमुख सुरेश माळी, शहाजी चवरे, दत्ता अंबुरे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष महेश भांगे, नगरसेवक अरूण कदम, नितीन साठे, मधूसुदन गायकवाड, सचिन चवरे, अनिल हणमे, औदुंबर चवरे, सोमनाथ चवरे, अजिंक्य काटे, अरविंद खरात, देविदास खरात यांच्यासह शाळेचे शिक्षक, शिक्षीका, व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# ‘शत्रू संपत्ती’ विकून मोदी सरकार तिजोरी भरणार

✔ सुराज्य/नवी दिल्ली

**मोदी सरकार देशातील ‘शत्रू संपत्ती’ विकण्याच्या तयारीत आहे. देशभरातील सुमारे १० हजार ठिकाणची शत्रू संपत्ती विकण्याचा सरकारचा मानस आहे. अशाप्रकारे शत्रू संपत्ती विकण्याचे काम केंद्र सरकारकडून पहिल्यांदाच केले जात आहे, असे नाही. यापूर्वीही २०१८ मध्येही केंद्राने शत्रू संपत्ती विकून सुमारे तीन हजार कोटी रुपये कमावले होते. त्यामुळे शत्रू संपत्ती म्हणजे काय? आणि केंद्र सरकार अशा संपत्तीवर लक्ष ठेवून का आहे? हे समजून घेणे महत्त्वाचे ठरते.**





### ‘शत्रू संपत्ती’ प्रकरणावर न्यायालयाची भूमिका

शत्रू संपत्तीबाबतचे प्रकरण यापूर्वीच सर्वोच्च न्यायालयात पोहोचले आहे. मोहम्मद अमिर मोहम्मद खान यांना ‘राजा महमुदाबाद’ म्हणून ओळखले जाते. ते मूळचे उत्तरप्रदेशातील सीतापूर येथील रहिवासी होते. भारत आणि पाकिस्तानच्या फाळणीच्यावेळी त्यांचे वडील अमिर अहमद खान इराकमध्ये निघून गेले. इराणमध्ये अनेक वर्षे राहिल्यानंतर त्यांनी १९५७ मध्ये पाकिस्तानचा नागरिकत्व घेतले. पण त्यांचा मुलगा मोहम्मद अमिर मोहम्मद खान भारतातच राहिले. त्यानंतर काही वर्षांनी १९६५ मध्ये भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्ध झाला. या युद्धानंतर भारत सरकारने लखनऊ, नैनिताल आणि सीतापूर येथील राजा महमूदाबाद यांची सर्व मालमत्ता ‘शत्रू संपत्ती’ म्हणून घोषित केली.

यानंतर हे प्रकरण तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याकडे गेले, पण यावर काही तोडगा निघाला नाही. पुढे हे प्रकरण मोरारजी देसाई यांच्याकडेही गेले पण त्यावर काहीही ठोस निर्णय झाला नाही.

अखेर मोहम्मद अमिर मोहम्मद खान यांनी न्यायालयात धाव घेतली. यानंतर मुंबई उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने मोहम्मद अमिर मोहम्मद खान यांच्या बाजूने निकाल दिला.

### ‘शत्रू संपत्ती’ कायद्यात सुधारणा

न्यायालयाचा हा निर्णय भारत सरकारसाठी मोठा धक्का होता. हे प्रकरण इतर ‘शत्रू संपत्ती’च्या बाबतीत उदाहरण बनू नये, अशी भीती सरकारला वाटत होती. त्यामुळे सरकारने शत्रू संपत्ती कायद्यात दुरुस्ती केली. मोदी सरकारने १७ मार्च २०१७ रोजी या कायद्यात सुधारणा करून ‘शत्रू संपत्ती’ची व्याख्या बदलली. या दुरुस्तीनंतर, सरकारने अशा लोकांनाही शत्रू मानले, जे कदाचित भारताचे नागरिक असतील पण त्यांना पाकिस्तानी नागरिकाच्या नावावर असलेली मालमत्ता वारसाहक्काने मिळाली आहे. इतकेच नव्हे तर या दुरुस्तीमध्ये सरकारला अशी शत्रू संपत्ती विकण्याचा अधिकारही प्रदान करण्यात आला. यानंतर राजा महमुदाबाद यांची सर्व संपत्ती सरकारकडे आली. आता ही सर्व संपत्ती विकून मोदी सरकार आपली तिजोरी भरण्याच्या तयारीत आहे.

### देशात एक लाख कोटींची ‘शत्रू संपत्ती’

केंद्र सरकारने यापूर्वी देशभरात सुमारे ९ हजार ४०० शत्रू संपत्ती शोधल्या होत्या. याची किंमत सुमारे १ लाख कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते. अशा मालमत्तांसाठी केंद्र सरकारने १९६८ साली ‘शत्रू संपत्ती कायदा’ तयार केला होता. नंतर मोदी सरकारच्या कार्यकाळात या कायद्यात सुधारणा करण्यात आली. या कायद्यानुसार, आता अशा मालमत्तांच्या मालकाला त्याच्या मालमत्तेची देखभाल करण्याचे काही अधिकार देण्यात आले आहेत.

### ‘शत्रू संपत्ती’ म्हणजे काय?

स्वातंत्र्यानंतर भारतातून पाकिस्तानात स्थायिक झालेल्या नागरिकांची भारतातील मालमत्ता सरकारने ‘शत्रू संपत्ती’ म्हणून घोषित केली आहे. याबाबत भारत सरकारने १० सप्टेंबर १९५९ रोजी पहिला आदेश जारी केला होता. त्यानंतर १८ डिसेंबर १९७१ रोजी दुसरा आदेश जारी केला. या आदेशानंतर भारतातील अशा प्रकारची सर्व मालमत्ता आपोआप ‘शत्रू संपत्ती’ म्हणून घोषित झाली. शत्रू संपत्ती म्हणजे अशी संपत्ती ज्याचा मालक शत्रू व्यक्ती नसते, पण शत्रू देश असतो.

खरं तर, भारत-पाकिस्तान फाळणीच्या वेळी कोट्यवधी लोक पाकिस्तानात गेले होते. पाकिस्तानात स्थलांतर करत असताना त्यांनी आपली संपत्ती इथेच सोडून गेले होते, अशा सर्व मालमत्तेला ‘शत्रू संपत्ती’ असे म्हटले जाते. ज्या लोकांनी किंवा कंपनीने पाकिस्तानी नागरिकत्व घेतले आहे, अशा सर्वांच्या मालमत्ता भारत सरकारने ताब्यात घेतल्या आहेत.

---

## नाशिकमध्ये पाच वर्षांत दहा हजार घटस्फोट



✔ सुराज्य/नाशिक

**गेल्या काही दिवसांपासून घटस्फोट घेण्याचं प्रमाण वाढलेलं दिसतंय. अनेक सेलिब्रिटींच्या घटस्फोटाच्या बातम्या वरचेवर येत असतात. तर, अनेकदा घटस्फोट घेतल्याची विचित्र कारणंही समोर येत आहे. मात्र, आता धक्कादायक माहिती समोर आली आहे की एकट्या नाशिकमध्ये पाच वर्षांत तब्बल दहा हजार घटस्फोट झाले आहेत.**

सोशल मीडियाचा अतिवापर, कमी झालेला पगार ही घटस्फोटाची प्रातिनिधीक कारणे आहेत.

भारतीय समाज व्यवस्थेत लग्न हा महत्त्वाचा संस्कार आहे. दोन जीवांसह दोन कुटुंबांचं नातं लग्नामुळे जुळतं. सध्या प्रेमविवाहाला अधिक पसंती मिळत असली तरीही ठरवून केलेल्या लग्नाची संख्याही जास्त आहे. मात्र, ज्या संख्येने हल्ली लग्न होत आहेत, तेवढ्याच संख्येने लग्न मोडण्याच्या घटनाही घडत आहेत. महत्त्वाचे म्हणजे लग्नाच्या सहा महिन्यांपासून ते तीन ते चार वर्षांत लग्न मोडल्याचे प्रकार समोर आले आहेत.

### दिवसाला येतात दहा अर्ज

नाशिकच्या कौटुंबिक न्यायालयाच्या मते २०१८ ते २०२२ या पाच वर्षांमध्ये १० हजार १४ जोडप्यांचे घटस्फोट झाले आहेत. २०१८ मध्ये १५४० घटस्फोट, २०१९ मध्ये १७१५, २०२० मध्ये २०८०, २०२१ मध्ये २३२७ तर २०२२ मध्ये २३५३ घटस्फोट झाल्याचे समोर आले आहेत. तर, अंदाजित माहितीनुसार, कोर्टात दहा दिवसाला घटस्फोटाचे दहा अर्ज दाखल होत आहेत.



## महेशबाबू यांचे वडील कृष्णा घट्टामनेनी यांचे निधन

✔ सुराज्य/हैद्राबाद

साऊथ सुपरस्टार महेश बाबू यांच्या वडिलांचे निधन झाले आहे. कृष्णा घट्टामनेनी यांनी वयाच्या ७९ व्या अखेरचा श्वास घेतला. कृष्णा घट्टामनेनी सुद्धा तेलुगूचे प्रसिद्ध अभिनेते होते. हैदराबाद येथील एका खासगी रुग्णालयात मंगळवारी सकाळी ४ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली.

कृष्णा घट्टामनेनी यांना सोमवारी हृदयविकाराचा झटका आला. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेलंगनाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनीही कृष्णा घट्टमनेनी यांच्या निधनावर शोक व्यक्त केला आहे. चित्रपटसृष्टीतील त्यांच्या योगदानाची त्यांनी आठवण करून दिली. तसेच कृष्णा यांच्या चाहत्यांनाही मोठा धक्का बसला आहे.

## पुण्यातील बुधवार पेठेत तुफान राडा

✔ सुराज्य/पुणे



**पुण्यातील बुधवार पेठ परिसरात दोन गटात तुफान हाणामारी झाल्याचा प्रकार समोर आला आहे. रविवारी रात्रीच्या सुमारास बुधवार पेठेतील क्रांती चौकात मारामारीचा प्रकार घडला. घटनेचे धक्कादायक सीसीटीव्ही फुटेज समोर आला आहे. यामध्ये आरोपी कोयत्याने वार करत असल्याचं दिसत आहे. रविवारी मध्यरात्री बारा वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला. पोलीस स्टेशनपासून हाकेच्या अंतरावर हाणामारीची घटना घडली. मात्र अजूनही पोलिसात घटनेची नोंद झाली नसल्याची माहिती आहे. सीसीटीव्हीमध्ये काही आरोपी कोयत्याने वार करताना दिसत आहे. ऐन गर्दीच्या वेळी हा प्रकार घडला असल्याने एकच पळापळ झाली. या घटनेनंतर पुन्हा एकदा सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.**

### भर चौकात दोन गट भिडले

पुण्यातल्या बुधवार पेठेमध्ये दोन अज्ञात व्यक्तींनी तिथे आलेल्या कॉलेजमधल्या मुलांना कोयत्याचा धाक दाखवत, हाणामारी करून दहशत माजवण्याचा प्रयत्न केला. हा सगळा प्रकार सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाला आहे. रविवारी रात्री बुधवार पेठेतील क्रांती चौकात हा प्रकार घडला. याबाबत कोणताही तक्रार फरासखाना पोलीस स्टेशनमध्ये दाखल नाहीये.

खात्रीलायक सूत्रांकडून माहिती मिळाल्यानुसार, दोन कॉलेजमध्ये शिकणारे मुलं बुधवार पेठेत फेरफटका व फिरण्यासाठी आले होते. त्याच वेळेस दोन अज्ञात व्यक्ती हे गाडीवर जात असताना त्यांनी कॉलेजमधल्या मुलांना कट मारला. त्या दोघांमध्ये एकाने त्याचा जाब विचारत डोळे नाहीत का नीट चालव असे बोलला. याचा राग मनात धरत पोरांनी गाडी वळवत येऊन त्याची कॉलर पकडून कोयता दाखवत धाक दाखवण्याचा प्रयत्न केला.

## ब्राह्मण असल्याचा आम्हांला गर्व : अमृता फडणवीस



✔ सुराज्य/नाशिक: ‘आम्ही ब्राम्हण आहोत, आम्हांला त्याचा गर्व आहे. आम्ही स्वाभिमानी आहोत, त्याचाही आम्हांला गर्व आहे. ब्राह्मण बुद्धिजीवी आहेत, ब्राह्मण लोकांना मार्केटिंग जमत नाही, पण जे काम करत जातो, त्यातून आमच्या कामाची प्रचिती येते, असे वक्तव्य अमृता फडणवीस यांनी केले. अखिल भारतीय बहुभाषीय ब्राह्मण महासंघ यांच्याशी काही वर्षांपासून माझे बोलणे सुरू आहे. जात, धर्म वेगळा ठेवून महासंघ काम करते असे म्हणत अमृता फडणवीसांनी महासंघाचे कौतुकही केले.’

अमृता फडणवीस यांनी नाशिकमध्ये आयोजित केलेल्या ब्राह्मण समाजाच्या ‘दीपावली स्नेह मिलन’ कार्यक्रमाला हजेरी लावली. या कार्यक्रमात बोलताना त्यांनी ब्राह्मण समाजाबद्दल गौरवोद्गार काढले. ब्राह्मण महापुरुष होते, ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात भरपूर मोठे काम केले. पण सध्या ब्राह्मण समाजाला मार्केटिंग जमत नाही. आपल्या वाट्याला आलेलं काम ब्राह्मण इमाने इतबारे करतात, असे अमृता म्हणाल्या. तसेच अखिल भारतीय बहुभाषीय ब्राम्हण महासंघांच्या मागण्यांविषयी मी सकारात्मक असल्याचे सांगत महासंघाच्या पाठीमागे मी खंबीरपणे उभी असल्याचेही त्या म्हणाल्या.

## आझमींवर प्राप्तीकर विभागाची धाड; मुंबईसह सहा शहरांमध्ये कारवाई!

✔ सुराज्य/मुंबई

गेल्या काही दिवसांपासून समाजवादी पक्षाचे नेते अबू आझमी यांनी सातत्याने केंद्र सरकारवर टीका चालवली होती.

मंगळवारी सकाळी अबू आझमींनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचा ‘नटवरलाल’ म्हणून उल्लेख केला होता. तसेच, केंद्र सरकारच्या धोरणांवरही अबू आझमी यांनी हल्लाबोल केला. या पार्श्वभूमीवर मंगळवारी दुपारच्या सुमारास अबू आझमी यांच्याशी संबंधित तब्बल ३० ठिकाणी प्राप्तीकर विभागाने धाडी टाकल्या आहेत. त्यामुळे राजकीय वर्तुळात तर्क-



वितर्कांना सुरूवात झाली आहे.

मुंबईसह देशभरातील एकूण सहा शहरांमध्ये या धाडी टाकण्यात आल्या आहेत.

अबू आझमी, त्यांचे निकटवर्तीय दिवंगत गणेश गुप्ता आणि त्यांच्या पत्नी आभा गणेश गुप्ता यांच्या काही मालमत्तांवर प्राप्तीकर विभागाने धाड टाकली आहे.

बेहिशेबी मालमत्ता, गुंतवणूक आणि काळा पैसा यासंदर्भात या धाडी प्राप्तीकर विभागाने टाकल्याची माहिती समोर येत आहे. अबू आझमी समाजवादी पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष असताना आभा गुप्ता या पक्षाच्या सचिव होत्या.

### तूप अपहार प्रकरणी संचालकांसह चौघांना अटक

✔ सुराज्य/जळगाव : जिल्हा सहकारी दूध संघातील तूप अपहारप्रकरणी दाखल गुन्ह्यात कार्यकारी संचालक मनोज लिमये यांच्यासह चौघांना शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने रात्री अटक केली.

या कारवाईमुळे राजकीय व सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

संघाच्या कार्यकारी संचालकांनाच अटक केल्यामुळे संचालक मंडळही अडचणीत येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

दरम्यान, निवडणुकीवर प्रभाव टाकण्यासाठी राजकीय दबावातून ही कारवाई झाल्याचा आरोप आ. एकनाथ खडसे यांनी केला आहे.

## आव्हाड यांना जामीन मंजूर

✔ सुराज्य/मुंबई



ठाणे कोर्टाने अटकपूर्व जामीन मंजूर केल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांना विनयभंग प्रकरणात दिलासा मिळाला आहे. १५ हजारांच्या जातमुचलक्यावर त्यांना जामीन मंजूर करण्यात आला आहे.

न्यायमूर्ती प्रणय गुप्ता यांनी हा निर्णय दिला. रिदा रशीद यांनी दिलेल्या तक्रारीवरून मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल झाल्यानंतर जितेंद्र आव्हाड यांनी ठाणे कोर्टात धाव घेत अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता.

दरम्यान, विनयभंग प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतर आव्हाडांनी आमदारकीचा राजीनामा देणार असल्याचे जाहीर केले होते. आता त्यांना जामीन मंजूर झाल्यानंतर प्रसारमाध्यमांनी त्यांना याबाबत विचारले असता, त्यांनी भूमिका स्पष्ट केली.

## ५० टक्के वीजनिर्मिती अक्षय उर्जास्त्रोतांपासून : मोदी

✔ सुराज्य/नवी दिल्ली

इंडोनेशियातील बाली येथील ‘जी-२०’ परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी सहभागी झाले. अमेरिका, फ्रान्स यासारख्या देशांचे राष्ट्रप्रमुख, पंतप्रधान यांनीदेखील या परिषदेस हजेरी लावली आहे.

दरम्यान, परिषदेस संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगाला मोठे आश्वासन दिले आहे. ‘भारत देश २०३० सालापर्यंत ५० टक्के वीजनिर्मिती ही अक्षय उर्जास्त्रोतांपासून करेल, त्यासाठी विकसनशील देशांना शाश्वत तंत्रज्ञानाचे हस्तांतरण, किफायतशीर वित्तपुरवठा आदी बाबी गरजेच्या आहेत, असे मोदी म्हणाले.

# शिंदे-ठाकरे गटात राडा

## ▸ राजन विचारेंवर फेकल्या पाण्याच्या बाटल्या

✔ सुराज्य/ठाणे

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. किसन नगरमध्ये ठाकरे आणि शिंदे गट आमने-सामने येत दोन्ही गटांमध्ये तुफान राडा झाला. ठाकरे गटाचे खासदार राजन विचारे यांच्यावर शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी पाण्याच्या बॉटल्स फेकून मारल्या. त्यामुळे प्रकरण चिघळले. दरम्यान, हा प्रकार सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झाला आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.**

ठाण्यातील किसन नगर येथे ठाकरे गटाकडून सोमवारी सायंकाळी कार्यकर्ता मेळावा आणि नव्या शाखेच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खासदार राजन विचारे उपस्थित राहिले होते. किसन नगर हा परिसर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा गड मानला जातो. त्यामुळे या परिसरात कार्यक्रमाच्या निमित्ताने शिंदे आणि ठाकरे गट आमनेसामने आले.

ठाकरे गटाच्या कार्यक्रमाला सुरुवात होताच, तिथे शिंदे गटाचे कार्यकर्ते आणि नगरसेवक हजर झाले. त्यांनी कार्यक्रम करण्यास विरोध केला. त्यामुळे दोन्ही गटात बाचाबाची झाली. सुरुवातीला एकमेकांविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. त्यानंतर मारहाण सुरू झाली. शिंदे गटातील कार्यकर्त्यांकडून ठाकरे गटातील कार्यकर्त्यांना मारहाण करण्यात आली. तसेच, खासदार राजन विचारे यांच्यावर पाण्याच्या बॉटल्स फेकल्या असल्याचेही सांगण्यात येतेय.

शिंदे गटाची मनमानी सुरू आहे. स्वत:च्या पदाचा गैरवापर सुरू आहे. त्यांची सत्ता असलेल्या ठिकाणी ते फिरू देण्यास मज्जाव करतात. अशी गुंडगिरी महाराष्ट्रात कधीच झाली नव्हती, असा घणाघात राजन विचारे यांनी केला. दरम्यान, हे प्रकरण श्रीनगर पोलीस ठाण्यात गेले. मात्र, तिथे गेल्यानंतरही पोलीस ठाण्याबाहेर पुन्हा या दोन्ही गटात राडा झाला. दोन्ही गटांनी एकमेकांविरोधात तक्रार दाखल केली आहे. त्यामुळे पोलीस आता कोणावर कारवाई करतात हे पाहावे लागणार आहे.

### लाठीचार्जची चौकशी करा : शिंदे गटाची मागणी

राष्ट्रवादीचे नेते तथा आमदार जितेंद्र आव्हाड यांनी आपल्या आमदारकीचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. भारतीय दंड विधानातील ३५४ कलमांतर्गत त्यांच्याविरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आल्यामुळे त्यांनी हा निर्णय घेतला आहे. याबाबतचे पत्रही त्यांनी विधानसभा अध्यक्षांच्या नावे लिहिले आहे.

वसईतील एका २६ वर्षीय तरुणीची तिच्याच प्रियकराने दिल्लीत खून करुन मृतदेहाचे ३५ तुकडे केल्याची धक्कादायक घटना समोर आल्यानंतर खळबळ माजली आहे. आरोपी प्रियकराने मृतदेहाचे तुकडे तीन आठवडे फ्रीजमध्ये ठेवले. त्यानंतर ते जंगल भागात विविध ठिकाणी फेकून दिले. सहा महिन्यानंतर हे क्रौर्य उघडकीस आले आहे. दरम्यान, पोलीस चौकशीत आरोपीने तिचा गळा दाबणे सोपे होते, पण मृतदेहाची विल्हेवाट लावणे फार कठीण होते असे म्हटले आहे.



## अपघात रोखण्यासाठी २४ तास वाहन तपासणी

✔ सुराज्य/पुणे

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील अपघात रोखण्यासाठी २४ तास वाहन तपासणी करण्याचे आदेश परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांनी सोमवारी दिले.

परिवहन आयुक्त भिमनवार यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व प्रादेशिक, उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची बैठक सोमवारी आयोजित करण्यात आली. या बैठकीत रस्ते सुरक्षा आणि राज्यातील विविध महामार्गांवर झालेल्या अपघातांच्या घटनांचा आढावा घेण्यात आला. त्या वेळी द्रुतगती मार्गावरील अपघात रोखणे तसेच सुरक्षाविषयक उपाययोजना याबाबत सेव्ह लाइफ फाउंडेशन आणि ब्लूमबर्ग संस्थेकडून काम करण्यात येत आहे. या संस्थांच्या प्रतिनिधींकडून बैठकीत रस्ते सुरक्षा तसेच उपाययोजनांबाबत सादरीकरण करण्यात आले. मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग तसेच जुना मुंबई-पुणे महामार्गावर झालेल्या अपघातांबाबत या संस्थेच्या प्रतिनिधींकडून सादरीकरण करण्यात आले. द्रुतगती मार्गावर पुण्याकडून मुंबईकडे जाणाऱ्या वाहनांच्या अपघातांचे प्रमाण जास्त असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

### परिवहन आयुक्तांचे आदेश

डिसेंबर महिन्यात मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग आणि मुंबई-पुणे महामार्गावर पुणे आणि पनवेल विभागाकडून विशेष मोहीम राबविण्यात यावी. या मोहिमेत पोलीस, परिवहन विभाग तसेच आयआरबीचे पथक २४ तास गस्त घालणार आहेत.

# पाटील-परिचारक गटाला जोर का झटका

## खा.महाडिकांकडून विरोधकांचे पानिपत

✔ सुराज्य/विरवडे

**मोहोळ तालुक्यातील टाकळी सिकंदर इथल्या भीमा सहकारी साखर कारखान्याची पंचवार्षिक निवडणूक ही यंदा विशेष गाजली. संपूर्ण राज्यसह सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागून राहलेल्या भीमा कारखान्याच्या निवडणुकीत सत्ताधारी भीमा शेतकरी विकास आघाडीने विजयाची हॅट्ट्रिक साधत विरोधकांचा पानिपत केले.**

चेअरमन खासदार धनंजय महाडिक यांच्या नेतृत्वाखालील भीमा शेतकरी विकास आघाडी आणि माजी आमदार राजन पाटील तसेच माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली भीमा बचाव परिवर्तन पॅनल यांच्यात आमने सामने लढत झाली. दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणात आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झाडण्यात आल्या. वैयक्तिक पातळीवर टीकाटिप्पणी केली गेली विशेष म्हणजे माजी आमदार राजन पाटील यांनी प्रचाराच्या समारोपाप्रसंगी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याने राज्यातील वातावरण ढवळून निघाले.

या निवडणुकीसाठी संचालक मंडळाच्या १५ जागांसाठी रविवारी एकूण ७८ टक्के मतदान झाले. निकालाबाबत सर्वांना उत्सुकता होती. मात्र सुरुवातीपासूनच सत्ताधारी भीमा शेतकरी विकास आघाडीने मतमोजणीत आघाडी घेतली ती कायम ठेवली आणि विजयाची हॅट्ट्रिक केली आणि विजयाचा गुलाल उधळला तिसऱ्यांदा खासदार धनंजय महाडिक यांनी सभासदांचा विश्वास प्राप्त करून कारखान्यावर निर्विवाद वर्चस्व सिद्ध करत विरोधकांचा धुव्वा उडवत विरोधकांचे पानीपत केले. खासदार धनंजय महाडिक यांनी तमाम सभासदांनी पुन्हा एकदा व्यक्त केलेल्या विश्वासाबद्दल मनापासून त्यांचे आभार मानले.

गेल्या दहा वर्षात जी जे अभिवचने शेतकऱ्यांना दिली त्यांची पूर्तता केल्याने आणि



विकासाची दृष्टी ठेवून काम केल्याने शेतकरी सभासद ठामपणे आमच्या पाठीशी उभे राहिले असे सांगून यापुढेही कारखान्याची प्रगती आणि घोडदौड कायम राहील अशी ग्वाही दिली. महाडिकांकडे तिसऱ्यांदा कारखाना आल्यामुळे शेतकऱ्यांच्या अपेक्षाही वाढल्या आहेत. त्या पूर्ण करणे आता महाडिकांपुढे आव्हान असणार आहे.

**नूतन चेअरमनपुढील आव्हाने**
इथेनॉल प्रकल्प सुरू करणे, सहवीजनिर्मिती प्रकल्पासाठी काढलेले कर्ज फेडणे, कारखान्याचा काटा व जाहीर केलेला उसाचा दर शेतकऱ्यांना वेळच्या वेळेत देणे, सभासदांना आता २५ किलो ऐवजी ५० किलो साखर देणे.

आम्ही महाडिकांवर पूर्ण विश्वास ठेवून त्यांना निवडून दिले आहे आमचा त्यांच्यावर व त्यांच्या कामावर विश्वास आहे त्यांनी आमच्या भागात उस तोड टोळ्या देऊन आमच्या भागतील ऊस कारखान्याला गळापासा घेऊन जावा ही अपेक्षा.

**- जयसिंग आवताडे, विरवडे बुद्रुक**

आम्ही व आमच्या भागातील सर्व शेतकरी भीमा कारखान्यालच ऊस घालत आलो आहे. त्यांचा काटा अगदी चोख आहे ,काट्यात कोणतेही पाप नाही. दोन वर्ष कारखाना थोड तोट्यात होता पण आता पुन्हा एकदा महाडिकांची सता आली आहे त्यामुळे कारखाना चांगला चालणार आम्हा सभासदांना दर ही चांगला मिळेल ही अपेक्षा.

**- अतुल चव्हाण, ढोकबाभुळगाव**

कारखान्याने तोडणी यंत्रणा सक्षम राबवून आमच्या भागातील कामती, विरवडे,पिरटाकळी,आदी भागात उस तोडणी यंत्रणा राबवावी व सभासदांना चांगला दर द्यावा ही अपेक्षा आहे.

**- महेश धुमाळ**

## रस्ते कामास विलंब; तीन ठेकेदारांना नोटिसा



✔ सुराज्य/सोलापूर

**रस्त्याचे कामे लवकरच पूर्ण होतील : आयुक्त**
पावसाळ्यामुळे शहरातील रस्त्यांची कामे थांबली होती आता काही ठिकाणी रस्त्यांची कामे पूर्ववत सुरू करण्यात आली आहेत. ज्या ठेकेदारांनी विलंब केला आहे अशा ठेकेदारांना नोटिसा दिल्या आहेत जे ठेकेदार लवकर काम करणार नाही त्यांना दंड ही करण्यत येईल. लवकरात लवकर शहरातील कामे रस्त्याची कामे पूर्ण होतील, असे पालिका आयुक्त पी.शिवशंकर यांनी सांगितले.

महापालिकेच्या वतीने शहरात विविध रस्त्यांची कामे सुरू आहेत. अनेक ठिकाणी ही कामे रखडले आहेत. ज्या ठिकाणी कामे रखडले आहेत अशा तीन ठेकेदारांना पालिकेच्या वतीने कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

महापालिकेच्या वतीने सोलापूर शहरात तब्बल १७ कोटींच्या निधीमधून २४ रस्त्यांची कामे पावसाळापूर्वी सुरू करण्यात आली होती मध्यंतरी पावसाचे प्रमाण जास्त असल्यामुळे ही कामे थांबवण्यात आली होती मात्र सध्या पावसाळा संपून महिना झाला तरी अनेक ठिकाणी अद्यापही रस्त्याची कामे सुरू झाली नाहीत. ठेकेदार विविध कारणे देत रस्ता करण्यास विलंब करत आहेत, अशा विलंब करणाऱ्या तीन ठेकेदारांना महापालिकेच्या वतीने कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे यापुढे जे ठेकेदार रस्त्याच्या कामास विलंब लावतील अशा ठेकेदारांना दररोज दंड आकारण्यात येईल असा इशाराही महापालिकेच्या वतीने देण्यात आला आहे.

## जि.प.च्या समाज कल्याण विभागाचा उपक्रम

## जागतिक दिव्यांग दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

✔ सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग सोलापूर यांच्या वतीने दिनांक ३ डिसेंबर रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे ,अशी माहिती जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर यांनी दिली आहे.

जागतिक दिव्यांग दिन दरवर्षी ३ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. याही वर्षी सोलापूर जिल्ह्यातील सर्व दिव्यांग शाळा मधील मुख्याध्यापक व शिक्षक यांची बैठक एन ए बी अंध कार्यशाळा येथे झाली. बैठकीमध्ये जागतिक दिव्यांग दिन २ व ३ डिसेंबर २०२२ रोजी विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील दिव्यांगाच्या सर्व प्रकारातील १२०० खेळाडूंसाठी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्याचे ठरविण्यात आले. या क्रीडा स्पर्धा या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा आहेत. स्पर्धेमध्ये ५०मीटर धावणे, १०० मीटर धावणे, २०० मीटर धावणे, गोळा फेक, थाळी फेक, तीन चाकी सायकल, सॉफ्टबॉल, प्रो स्टँडिंग, लाँग जंप, रनिंग लाँग जंप आदी क्रीडा प्रकारांचा समावेश असेल. क्रीडा स्पर्धा या नेहरूनगर या कार्यक्रमास जिल्ह्यातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. ३ डिसेंबर रोजी सकाळी जनजागृती पर प्रभात फेरीचे आयोजन करण्यात येणार आहे. सकाळी ११ वाजता दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांचे विविध गुणदर्शनाचा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे त्यामध्ये गोंधळी गीत भारुड नृत्यविष्कार एकांकिका इत्यादींचे सादरीकरण होणार आहे. कार्यक्रमात मोठ्या संख्येने दिव्यांग विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.



कार्यक्रमयशस्वीकरण्यासाठी जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खामीतकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयातील कर्मचारी व दिव्यांग शाळेतील शिक्षक परिश्रम घेत आहेत. या स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवा असे आवाहन जि प चे सीईओ स्वामी आणि समाज कल्याणचे सुनील कमीतकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## महापालिकेतील जुने रेकॉर्ड वर्गीकरणाचे काम युद्ध पातळीवर

## आयुक्तांकडून कामाची पाहणी; रेकॉर्डचे स्कॅनिंग, लवकरच होणार पूर्ण

✔ सुराज्य/सोलापूर

महापालिकेतील विविध विभागातील जुन्या रेकॉर्डचे वर्गीकरण युद्धपातळीवर करण्यात येत आहे. आवश्यक आणि अनावश्यक अशा पद्धतीने हे वर्गीकरण केले जात असून आवश्यक रेकॉर्ड हे स्कॅनिंग करून कॉम्पॅक्ट डिस्कमध्ये जतन केले जाणार आहे. त्यानंतर डाटा एन्ट्री करून हे सर्व रेकॉर्ड ठेवले जाणार असल्याची माहिती आयुक्त पी शिवशंकर यांनी दिली.

सोलापूर महापालिकेतील मुख्य लेखापाल विभाग, जन्ममृत्यू यासह महत्त्वाच्या विभागातील जुने रेकॉर्ड वर्गीकरणाचे काम युद्ध पातळीवर कौन्सिल हॉलमधील खालच्या विभागात सुरू आहे. या ठिकाणी सर्व कर्मचारी रेकॉर्ड रूममध्ये ठेवलेले जुने रेकॉर्ड तपासणी करीत आहेत. महापालिका स्थापनेपासूनच सर्व रेकॉर्ड तपासले जात आहे. दरम्यान, महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी मंगळवारी सायंकाळी येथील रेकॉर्ड वर्गीकरण कामाची पाहणी केली. आवश्यक त्या सूचना दिल्या. यावेळी मुख्य लेखापाल रूपाली कोळी यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



**दोन पद्धतीत रेकॉर्डचे वर्गीकरण**
या रेकॉर्ड मधून आवश्यक व अनावश्यक अशा दोन पद्धतीत हे रेकॉर्ड वर्गीकरण केले जात आहे. आवश्यक असलेले हे रेकॉर्ड स्कॅनिंग करून कॉम्पॅक्ट डिस्कमध्ये जतन करण्यात येणार आहे. त्याचबरोबर डाटा एन्ट्री करण्यात येत आहे. लवकरच हे काम पूर्ण होईल. अनावश्यक रेकॉर्ड निष्काषित करण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी दिली. एडीटीपीचे ८० हजार रेकॉर्ड स्कॅनिंग व डाटा एन्ट्री चे काम ही सुरू आहे. लवकरच हे सर्व काम पूर्ण होईल असेही ते म्हणाले.

**पेन्शन कक्ष अर्धा दिवस सुरू राहणार**
रेकॉर्ड वर्गीकरण कामात मुख्य लेखापाल कार्यालय अंतर्गत असलेले बहुतांश कर्मचारी गुंतले आहेत. यामुळे महापालिकेतील पेन्शन कक्ष बंद ठेवल्याने गैरसोय होणार नाही का अशी विचारले असता या पेन्शन कक्षात अर्धा दिवस संबंधित कर्मचारी काम करतील आणि उर्वरित अर्धा दिवस रेकॉर्ड वर्गीकरणाचे काम करतील. यामुळे कोणाची गैरसोय होणार नाही असेही महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी सांगितले.

## आज रिपब्लिकन नवचैतन्य मेळावा

✔ **सोलापूर** : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्या सोलापूर शहर मध्य विधानसभाच्यावतीने रिपब्लिकन नवचैतन्य मेळावा बुधवार दि. १६ रोजी सायंकाळी ६ वाजता फॉरेस्ट येथे आयोजित केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या बुद्धनगर फॉरेस्ट येथे प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्यासह पदाधिकारी मार्गदर्शन करणार आहेत. मेळाव्याला उपस्थित रहावे, असे आवाहन शहराध्यक्ष अतुल नागटिळक आणि शहर मध्य विधानसभा सरचिटणीस अभिजित तिर्थे यांनी केले आहे.

## मालवाहतूक वाहनाच्या धडकेत एकजण जखमी

✔ सुराज्य/सोलापूर


मालवाहतूक वाहन चालकाने एकास धडक देऊन त्याच्या पायाच्या मांडीचे हाड फॅक्चर करून जखमी केल्याप्रकरणी मालवाहतूक टमटम चालकाविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि.१० नोव्हेंबर रोजी दुपारी सव्वातीन वाजण्याच्या दरम्यान शानदार चौक ते भारत नगर या रस्त्यावर घडली.

याप्रकरणी शिवाजी अरुण घोडके (वय-३०, रा.भारत नगर,कुमठा नाका) यांनी सदर बाजार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून एम.एच.१३. सीटी.९०२१ या क्रमांकाच्या चालका विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. शिवाजी हे वरील ठिकाण्यावरून पायी चालत जात होता. त्यावेळी वरील तीन चाकी मालवाहतूक करणाऱ्या टमटम चालकाने अतिवेगाने व हयगयीने वाहन चालून फिर्यादी यांच्या उजव्या पायाच्या मांडीचे हाड फॅक्चर करण्यास कारणीभूत झाला आहे, असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## तांदुळवाडीच्या सिद्धनाथ जोगेश्वरीच्या यात्रा सोहळ्यास आजपासून प्रारंभ

✔ **वेळापूर** : तांदुळवाडी तालुका माळशिरस येथील ग्रामस्थांचे आराध्य दैवत श्री सिद्धनाथ जोगेश्वरी दैवताचे तीन दिवसाच्या यात्रा सोहळ्यास बुधवारपासून प्रारंभ होत आहे.

तांदुळवाडी येथील सिद्धनाथ जोगेश्वराचे मंदिर हे शिवकालीन मंदिर असून नवसाला पावणारा देव म्हणून ख्याती आहे अशी माहिती सिद्धनाथाचे पुजारी आनंद रामचंद्र गुरव यांनी दिली. त्यांनी सांगितले की सिद्धनाथाचा उत्सव हा तीन दिवस चालतो या यात्रा सोहळ्याला ग्रामस्थ नातेवाईक, भाविक, मोठ्या संख्येने सहभागी होतात. बाहेर गावी असलेले ही सिद्धनाथाच्या यात्रासोहळ्याला गावात येतात. सिद्धनाथ जोगेश्वरी यात्रा सोहळा हा सर्व ग्रामस्थ लोकवर्गणीतून करतात.



सध्या सिध्दनाथ जोगेश्वरि मंदिराला आतून बाहेरून रंगकाम करण्यात आले असून मंदिर परिसरात लाईटचे डेकोरेशन करून सुशभीकरण करण्यात आले आहे. त्याचबरोबर ग्रामस्थांच्या वतीने मंदिरामध्ये पाण्याची सोय करण्यात आली आहे. मंदिरामध्ये रोज पहाटे ५.३० वाजता सिद्धनाथाची आरती केली जाते. त्याचबरोबर सिद्धनाथ जोगेश्वरी मंदिरात प्रत्येक पौर्णिमेला महाप्रसादाचे वाटप केले जाते. जन्मोत्सवानंतर दुसऱ्या दिवशी पहाटे पाच वाजता सर्व ग्रामस्थांच्या वतीने सिद्धनाथाला अभिषेक केला जातो व काठी मिरवणुकीने यात्रा सोहळ्याची सांगता होते. सिद्धनाथ जोगेश्वरी यात्रा सोहळा पार पाडण्यासाठी तांदुळवाडी ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व यात्रा नियोजन समितीचे सदस्य आणि ग्रामस्थ सहकार्य करीत आहेत.

## विवाहितेचा मृत्यू; पतीसह चौघांवर गुन्हा

✔ सुराज्य/सोलापूर

विवाहितेच्या मृत्यूप्रकरणी पतीसह चार जणांविरुद्ध सदर बाजार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि.१२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी फलटण मशीदच्या समोर लष्कर येथे घडली. याप्रकरणी इस्माईल लालअहमद बेपारी (वय-४३, रा.शहापूर दरवाजा जवळ, मुल्ला मशीद समोर, जेलरोड विजापूर शहर,कर्नाटक) यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती शाहिद सलाम कुरेशी, सासू रजिया सलाम कुरेशी, दिर निजाम सलाम कुरेशी व उमर सलाम कुरेशी (सर्व रा.फलटण मशीद समोर, लष्कर, सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

इस्माईल यांची पुतणी मासिबा कुरेशी यांना वरील संशयित आरोपींनी घर घेण्यासाठी पाच लाखापैकी तीन लाख रुपये आणण्याची मागणी केली. तसेच घरातील कामे करण्याच्या कारणावरून मासिबाला मारहाण करून शारीरिक व मानसिक छळ केला.त्यानंतर मिसबा कुरेशी यांना गळफास घेण्यास भाग पाडून तिचा मृत्यू घडवून आणला आहे, असे फिर्यादीत नमूद आहे. तपास सहायक पोलीस निरीक्षक कांबळे हे करीत आहेत.

## वॉल कंपाऊंड करण्यासाठी गेल्यावर महिलेस शिवीगाळ

✔ **सोलापूर** : स्वतःच्या खुल्या प्लॉटला वॉल कंपाऊंड करण्यासाठी काही कामगारांना सोबत घेऊन सारिका हिराचंद जोजारे यांना शिवीगाळ करून अंगावर धावून आल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना दि.१४ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास उमा नगरी प्लॉट नंबर ९८ येथे घडली.याप्रकरणी सारिका हिराचंद जोजारे (वय-४२,रा.उमा नगरी, मुरारजी पेठ,सध्या- प्रतीक नगर, शरद चंद्रपवार शाळेजवळ, सोलापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून गणेश सुरेश शिंदे व दिनेश शिंदे (रा.सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक कसबे हे करीत आहेत.











